मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

Email : vrittamanas1@gmail. com

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | बुधवार, ६ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-४६ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये





**24 तासांत हिंदुस्थानवर मोठा टॅरिफ लादणार**

पान 8

# उत्तरकाशीत ढगफुटीमुळे हाहाकार; 4 जणांचा मृत्यू, 50 बेपत्ता

■ **देहरादून**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात मंगळवारी ढगफुटीमुळे हाहाकार उडाला. मंगळवारी दुपारी उत्तरकाशीतील हर्सिल येथील भारतीय लष्कराच्या कॅम्पपासून सुमारे ४ किमी अंतरावर धराली गावात ढगफुटी झाली. यामुळे भूस्खलन होऊन किमान ४ जणांचा मृत्यू झाला. तर सुमारे ५० लोक बेपत्ता आहेत. ढगफुटी आणि भूस्खलनामुळे पवित्र गंगोत्री धामशी



## ढगफुटीत हेलिपॅडही गेला वाहून

## लष्करी तळालाही फटका, अनेक जवान बेपत्ता

संपर्क तुटला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे पाण्यासोबत मातीचा ढिगारा सगळीकडे पसरला आहे. या ढगफुटीत हेलिपॅडही वाहून गेला असून लष्करी तळालाही फटका बसला आहे. अनेक जवान बेपत्ता आहेत. आर्मी आणि एनडीआरएफ पथके बचावकार्यासाठी तत्काळ घटनास्थळी रवाना झाली.

धराली गावात खीर गंगा नदीच्या वरच्या पाणलोट क्षेत्रात ढगफुटीची झाली. यात चार जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी उत्तरकाशीचे जिल्हा दंडाधिकारी प्रशांत आर्य यांनी केली आहे. लष्कर, एनडीआरएफ आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) यांची पथके शोध आणि बचाव कार्यासाठी या भागात तैनात करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या भागात भूस्खलन झाले आहे तिथे अनेक लहान अतिथीगृहे, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स आहेत.

# ‘ऑपरेशन सिंदूर’वरील चर्चेनंतर विरोधकांना पश्चाताप – पंतप्रधान

प्रतिनिधी

■ **नवी दिल्ली**

‘ऑपरेशन सिंदूर’ हा भारतीय सैन्याचा सन्मान आणि पराक्रम असून तो देशासमोर मांडणे हे कर्तव्य आहे. त्याचवेळी त्यावर संसदेत चर्चेची मागणी करून विरोधी पक्षांनी ‘सेल्फगोल’ केला असून त्याचा आता त्यांना पश्चाताप होत आहे, असा टोला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी लगावला आहे.



**विरोधी पक्षनेते बालिश, मोदींची गांधींवर घणाघाती टीका**

भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) संसदीय पक्षाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रालोआच्या लोकसभा आणि राज्यसभेतील खासदारांना संबोधित केले. यावेळी पंतप्रधान म्हणाले, भारतीय सैन्याने आपल्या पराक्रमाने शत्रूला धूळ चारली आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’ हा भारतीय सैन्याचा सन्मान आणि पराक्रम असून तो देशासमोर मांडणे हे कर्तव्य ठरते. विरोधी पक्षांनीही त्यावर संसदेत चर्चेची मागणी केली होती. मात्र, आता ‘ऑपरेशन सिंदूर’वर चर्चा झाल्यानंतर विरोधकांना आपण ‘सेल्फगोल’ केल्याची जाणीव झाली असून आता त्यांना पश्चाताप होत आहे. आपल्याच पायांवर कुऱ्हाड मारून घेणारा विरोध पक्ष जगात कोठेही नसेल. अशा प्रकारच्या चर्चांची मागणी विरोधकांनी वारंवार करावी, जेणेकरून आपल्याला सत्य सांगण्याची संधी मिळेल; असे पंतप्रधानांनी म्हटले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे नाव घेता पंतप्रधानांनी त्यांना टोला लगावला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, विरोधी पक्षाचे नेते बालिशपणे बोलतात आणि त्यामुळेच त्यांना आता सर्वोच्च न्यायालयाने फटकारले जात आहे. काल (सोमवारी) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या झटक्यापेक्षा मोठी शिक्षा असू शकत नाही, असाही घणाघात यावेळी त्यांनी केला. रालोआ संसदीय पक्षाच्या बैठकीत ‘ऑपरेशन सिंदूर’ संदर्भात एक ठराव मंजूर करण्यात आला. रालोआसंसदीय पक्षाने ‘ऑपरेशन सिंदूर’ आणि ‘ऑपरेशन महादेव’ दरम्यान भारतीय सैन्याने दाखवलेल्या धाडसाला वंदन केले. यासोबतच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांनाही श्रद्धांजली वाहण्यात आली.

## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

# वाढवण बंदर ते समृद्धी महामार्ग भरवीरपर्यंत जोडणाऱ्या रस्त्याला मंजुरी

प्रतिनिधी

■ **मुंबई**

राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत राज्याच्या विकासाला गती देणारे आणि सामाजिक कल्याणाला चालना देणारे सात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील स्टार्टअप्स, उद्योजकता, पायाभूत सुविधा, शासकीय मालमत्ता, कामगार, आरोग्य आणि नागरी विकास क्षेत्र याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.


कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ जाहीर केले आहे. या धोरणामुळे राज्यातील नवउद्योजकांना प्रोत्साहन, नवकल्पना आणि रोजगारनिर्मितीला मोठा हातभार लागणार आहे. नव्या धोरणामुळे स्टार्टअप्ससाठी अनुकूल वातावरण निर्माण होईल, तसेच कौशल्यविकास आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांना प्रोत्साहन मिळेल.

**वाढवण बंदर ते समृद्धी महामार्ग फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रस्तावानुसार वाढवण बंदर (तवा) ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग (भरवीर येथे) जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासाठी आखणी आणि भूसंपादन प्रक्रियेस मान्यता देण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मालवाहतुकीस गती मिळणार असून, औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

**भूखंड वितरणाचे सुधारित धोरण**

महसूल विभागाने राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरणासाठी नवीन धोरण मंजूर केले आहे. यामुळे अशा भूखंडांचा शासकीय वापर किंवा विक्री सुलभ होणार आहे.



**एसटी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी वापर**

परिवहन विभागाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर करण्यासाठी सुधारित धोरणास मंजुरी दिली आहे. यामुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. वस्त्रोद्योग विभागाच्या निर्णयानुसार, नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या १,१२४ कामगारांना ५० कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान सूतगिरणीच्या जमीन विक्रीतून मिळणाऱ्या निधीतून दिले जाईल, ज्यामुळे कामगारांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

## म ह त्वा चे

### मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त ‘शोज’ मिळवून देणार



**मुंबई -** मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्स मध्ये अतिरिक्त शोज मिळवून देण्यासह या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासन स्तरावर समिती स्थापन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. समितीने दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करावा, मराठी सिनेमा जगला पाहिजे अशी राज्य शासनाची भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. मराठी सिनेमांना मल्टिप्लेक्स मध्ये मिळणाऱ्या कमी स्क्रीन, तसेच त्यांना कोणतीही माहिती न देता तीन दिवसात सिनेमा थिएटरमधून उतरवणे, तसेच सेन्सॉर बोर्डाकडून मराठी सिनेमांना सेन्सॉर संमती, मराठी सिनेमाच्या खेळांच्या वेळा ऐनवेळी बदलणे अथवा रद्द करणे यासारख्या अनेक प्रश्नांबाबत मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक आणि विविध पक्षांच्या सिने कर्मचारी संघटनांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने मंत्रालयात बैठक झाली.

### मराठी चित्रपट पुरस्कार कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांसामोर घोषणाबाजी

**मुंबई -** वरळी येथील 61 वा हीरक महोत्सवी महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण सुरू असतानाच दोघांनी घोषणाबाजी केल्याचा प्रकार समोर आला आहे. 'खालिद का शिवाजी' नामक चित्रपटाला विरोध करत या घोषणाबाजी करण्यात आल्याचे समोर आले आहे. खालिद का शिवाजी हा चित्रपट प्रदर्शित होऊ नये म्हणून ही घोषणाबाजी करण्यात आली असल्याचे समजते.

## पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात नवा ट्विस्ट

# प्रांजल खेवलकर प्रकरणात आता रुपाली चाकणकरांची ‘एंट्री’

प्रतिनिधी

■ **पुणे**

शहरातील एका फ्लॅटवर झालेल्या पार्टीप्रकरणात माजी मंत्री आणि आमदार एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवळकर अडकले असून त्यांच्यासह साथीदारांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी, अद्याप न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने एकनाथ खडसेंनी अधिक बोलणे टाळले आहे. तर, रोहिणी खडसे यांनी शनिवारी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची भेट घेतली. प्रांजल खेवलकर पोलिसांच्या ताब्यात असल्यामुळे शरद पवार आणि रोहिणी खडसे यांच्यात रेव्ह पार्टी संबंधित चर्चा झाली असणार आहे. याप्रकरणी, आता आणखी नवा ट्विस्ट आला आहे. कारण, राज्य महिला आयोगाने पोलीस आयुक्तांना पत्र लिहून एका बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेनं पुण्यातील रेव्ह पार्टीसंदर्भाने तक्रार केली असून त्याच्या तपासाचा अहवाल अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी मागवला आहे.

पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रांजल खेवलकर यांच्या विरोधात बीडमधील एका संस्थेने राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली. प्रज्ञा खोसरे यांच्या सानवी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेकडून ही तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीत प्रांजल खेवलकर यांनी खराडी भागातील ते हॉटेल 28 वेळा बुक करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. खेवलकर यांनी या हॉटेलमध्ये अनेकवेळा मुलींना बोलावल्याचा आरोप देखील करण्यात आला असून हा मानवी तस्करीचा प्रकार असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.



# दोन वर्षांपूर्वी भाजप प्रवक्त्या, आता मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश

## आरती साठेंच्या निवडीवर रोहित पवारांचा सवाल

प्रतिनिधी

■ **मुंबई**

सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने 28 जुलै रोजी मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार मुंबई उच्च न्यायालयात तीन नवीन न्यायाधीशांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये आरती साठे यांचे नाव आल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधान आले आहे. आरती साठे या दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील भाजपच्या प्रवक्त्या राहिलेल्या आहेत, यामूळे सत्ताधारी पक्षाची प्रवक्ता म्हणून बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणं म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वांत मोठा आघात आहे असे ट्विट रोहित पवार यांनी केले आहे.

आमदार रोहित पवार यांनी या निवडीवर टीका करत संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? असा सवाल देखील केला आहे. सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणं म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वांत मोठा आघात आहे. याचा भारतीय न्याय व्यवस्थेच्या निःपक्षपणावर दूरगामी परिणाम होईल. केवळ न्यायाधीश होण्याची पात्रता आहे म्हणून थेट राजकीय व्यक्तींना न्यायाधीश म्हणून नेमणं म्हणजे न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? असा सवाल रोहीत पवार यांनी केला.

पान 8 वर

### भाजप पदाधिकारीच न्यायाधीश झाले तर न्यायपालिकेचा निष्पक्षपणा धोक्यात!



लोकशाहीच्या चार स्तंभापैकी न्यायपालिका हा एक अत्यंत महत्वाचा स्तंभ आहे. सर्वसामान्य जनतेचा आजही न्यायपालिकेवर विश्वास आहे. परंतु मागील काही वर्षातील घटना पाहता न्यायपालिकेवरचा विश्वासही डळमळीत होत चालला आहे. आता तर थेट न्यायाधिशपदावरही सत्ताधारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती होत असेल तर ते निष्पक्षपातीपणे न्याय देतील याबाबत शंका नक्कीच येऊ शकते आणि हा प्रकार लोकशाहीला अत्यंत घातक आहे, असे परखड मत महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.

# जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं निधन

प्रतिनिधी

■ **दिल्ली**

जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे आज वयाच्या ७९ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. दुपारी १ वाजता नवी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



मलिक यांनी ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीर राज्याचे शेवटचे राज्यपाल म्हणून काम पाहिले. त्यांच्याच कार्यकाळात ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करण्यात आले आणि राज्याचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला. आज या निर्णयाला सहा वर्ष झाली आहेत. नंतर त्यांना गोव्याचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर २०२२ पर्यंत मेघालयाचे राज्यपाल म्हणून त्यांनी काम पाहिले.

# एसटी महामंडळ ‘यात्री ॲप’ आणणार

## परिवहन मंत्री सरनाईक यांची घोषणा

प्रतिनिधी

■ **मुंबई**

चालकांना सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत ‘यात्री ॲप’ लवकरच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) मार्फत सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



मंत्रालयात आयोजित केंद्र व राज्य शासनाच्या प्रवासी वाहतुकीविषयी ॲग्रीगेटेड पॉलिसीच्या (समुच्चयक धोरण) अधीन राहून राज्य शासनाचे ‘यात्री ॲप’ बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील बैठकीत मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर व इतर अधिकारी उपस्थित होते. यात्री ॲप चालविण्यासाठी एसटी महामंडळाची प्रवाशांप्रती असलेली निष्ठा आणि वर्षानुवर्षापासूनची विश्वासार्हता उपयोगी पडणार असून उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होणार आहे, असेही मंत्री श्री. सरनाईक सांगितले.

पान 8 वर

## स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूकीत VVPAT चा वापर होणार नाही

प्रतिनिधी

■ **मुंबई**




महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक दिवाळीनंतर म्हणजे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी दिली. विशेष म्हणजे या निवडणुकीत ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट मशीनचा वापर होणार नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे विरोधी पक्षांनी यापूर्वी अनेकदा ईव्हीएम व व्हीव्हीपॅटमधील मतांची जुळवणी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आयोगाच्या व्हीव्हीपॅट न वापरण्याच्या निर्णयावर मोठा वाद होण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी नाशिक विभागातील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. या बैठकीला नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यात दिवाळीनंतर टप्याटप्याने निवडणूक होणार असल्याची माहिती दिली.

# राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्राधिकरण स्थापन करणार - मुख्यमंत्री

प्रतिनिधी

■ **मुंबई**

राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी "महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण (MSRRA)" स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंजुरी दिली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरुज्जीवन साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह राखण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी हे प्राधिकरण विकासात्मक भूमिका बजावेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

- **नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी मंत्री पंकजा मुंडे यांचा पुढाकार**
- **नदी पुनरुज्जीवनाचे मुख्यमंत्र्यासमोर केले विस्तृत सादरीकरण**



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीला पर्यावरण आणि हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे तसेच सल्लागार संस्थेच्या नमिता रेपे उपस्थित होत्या.

प्राधिकरणाच्या रचना व संकल्पनेचे पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी विस्तृत सादरीकरण केले. नदी पुनरुज्जीवनासाठी डीपीआर व खोरे व्यवस्थापन योजना मंजूर करणे, अतिक्रमण, वीज, भूसंपादन यासंबंधी अडचणी सोडवणे, राष्ट्रीय योजनांसाठी निवडक प्रकल्पांची शिफारस करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये

पान 8 वर

## मेट्रो पुलावरून सळई कोसळून रिक्षातील प्रवाशाच्या डोक्यात घुसली

**ठाणे।** भिवंडी-कल्याण मेट्रो ५ च्या मार्गावरील सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी पुलावरून लांबलचक लोखंडी सळई कोसळल्यानं दुर्घटना झाली. सळई थेट रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षातील प्रवाशाच्या डोक्यात घुसली. यावेळी प्रवासी गंभीर जखमी झाला. सोनू अली, (वय २० रा.विठ्ठलनगर भिवंडी ) असे गंभीर जखमी प्रवाशाचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी शहरातील ठाणे-भिवंडी या मेट्रो मार्गाच्या पहिल्या टप्प्यातील काम सुरू आहे. आज दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास मेट्रोच्या पुलालवरून अचानक लोखंडी सळई कोसळली. सोनू अली हा रिक्षातून प्रवास करीत असतानाच ७ ते ८ फूट लांब आणि जाडीला २० एमएम असलेली एक सळई थेट खाली रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षावर आदळली. ही सळई रिक्षातील प्रवाशाच्या डोक्यात घुसली.

२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, बुधवार, ६ ऑगस्ट २०२५

## साईनगर ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यावतीने जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे

**मुंबई :** अंधेरी पूर्व येथील साईनगर लोकसेवा समितीच्या ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यावतीने प्रत्येक महिन्याला साईनगर ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करण्यात येतात. ६० वर्षावरील ज्येष्ठांचे वाढदिवस शाल, श्रीफळ, गुच्छ व बिस्कीट चा पुडा देऊन केले जाते या रविवारी मधु शिरोडकर यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.यावेळी संघटनेचे अध्यक्ष दीपक सावंत व्यवस्थापक शंकर सुगदे, कार्याध्यक्ष अनंत दाभोळकर उपाध्यक्ष श्रद्धानंद जाधव, व सरचिटणीस वासुदेव दळवी ,समाजसेवक शशिकांत लाखन समाजसेवक अशोक माहुलकर , वासुदेव पाष्टे , अनुराधा मोहिते, विश्वनाथ पाटणकर, रमेश तावडे, सतीश राणे, सुनील तळेकर , खजिनदार गिरीश शेलार उपस्थित होते



## थोडक्यात

### कॉंग्रेसच्या नवनियुक्त ब्लॉक अध्यक्षांचे 7, 8 ऑगस्टला निवासी शिबीर

**मुंबई:** महाराष्ट्र कॉंग्रेसने दिनांक ७ व ८ ऑगस्ट २०२५ रोजी पक्षाचे दादर येथील मुख्यालय टिळक भवन येथे नवनियुक्त ब्लॉक अध्यक्षांचे शिबीर आयोजित केले आहे. हे दोन दिवसीय निवासी शिबीर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. दिनांक ४ जून २०२५ व २६ जून २०२५ रोजी निवड समितीसमोर मुलाखती घेऊन ब्लॉक अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्वच ५५३ ब्लॉक अध्यक्षांचे शिबिर घेण्याचे प्रदेशाध्यक्षांनी ठरविले असून पहिल्या टप्प्यात नवनियुक्त ब्लॉक अध्यक्षांचे शिबिर पार पडणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्वांचे शिबिर होणार आहे. ७ ऑगस्ट रोजी सकाळी या शिबिराची सुरुवात होणार असून दुसऱ्या दिवशी ८ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता शिबिराची सांगता होणार आहे. नेते व विविध क्षेत्रातील वक्ते या शिबिराला मार्गदर्शन करणार आहेत.

### बालवाडी शिक्षक व मदतनीस यांना दोन महिने पगार नाही

**मुंबई:** महापालिकेच्या बालवाडी शिक्षक मदतनीस यांना जून जुलै चा पगार अद्याप मिळाला नाही. रक्षाबंधन चार दिवसांवर येऊन ठेपली असतानाही पगार अद्याप मिळाल्यामुळे बालवाडी शिक्षिका व मदतनीस चिंतेत आहेत. पालिकेच्या ९०० बालवाड्यांमधील ९०० शिक्षिका आणि ९०० मदतनिसांना वेळेवर मानधन मिळत नसल्याच्या तक्रारींची शिक्षण विभागाने यापूर्वी दखल घेतली आहे. सहायक कामगार आयुक्त अतुल सावरकर यांच्या पुढाकाराने झालेल्या चर्चेनंतर शिक्षण विभागाने २८ जुलै २०२५ रोजी स्पष्ट आदेश काढत प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे मानधन वेळेत द्यावे, असे निर्देश दिले आहेत. पण त्यानंतरही वेळेवर पगार मिळत नसल्याची खंत श्रमिक भारतीय युनियनचे अध्यक्ष रमेश जाधव यांनी व्यक्त केली आहे.

### महावितरण वीज बिल डाऊनलोडसाठी आता 'लॉगिन' अनिवार्य

**मुंबई:** सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे.महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावरील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (View/Pay Bill) पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाइन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमीट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांच्यासह बविआचे माजी नगरसेवक नितीन ठाकूर भाजपात

**उबाठा व बहुजन विकास आघाडीला भगदाड**



प्रतिनिधी
■ वसई

ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पंकज देशमुख व बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक नितीन ठाकूर यांनी एकाच वेळी भाजपात प्रवेश केल्याने भाजपाची वसई- विरारमधील संघटनात्मक ताकद वाढली आहे. महत्वाचे पदाधिकारी भाजपात सामिल झाल्याने उबाठा गट व बहुजन विकास आघाडीला मोठे भगदाड पडले आहे. ठाकरे गटाचा पालघर जिल्ह्याचा सेनापतीच भाजपात सामिल झाल्याने उबाठा गटासाठी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. तर नायगाव परिसरातील बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक नितीन ठाकूर हे देखील भाजपात प्रवेशकर्ते झाले असल्याने भाजपाची ताकद वाढली आहे. तर आगामी पालिका प्रशासनाची निवडणूक आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर दृष्टीपथात आली आहे. त्यामुळे आता भाजपात प्रवेशकर्ते झालेल्या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांमुळे वसई- विरार परिसरात भाजपाची राजकीय ताकद वाढली आहे. तर भाजपाच्या गटात मोठ्या नेत्यांच्या पक्षप्रवेशाने जल्लोष पाहायला मिळत आहे.दरम्यान, मुंबईत हा पक्षप्रवेश झाला.

"आधी राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" या राष्ट्रहितप्रधान विचारधारेवर विश्वास ठेवत व पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वसई विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात मंगळवारी भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यालय नरिमन पॉईंट मुंबई येथे भव्य प्रमाणात जाहीर प्रवेश केला. या भव्य पक्षप्रवेश कार्यक्रमात भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या व वसईच्या विद्यमान आमदार स्नेहा दुबे-पंडित यांच्या शुभहस्ते नवीन कार्यकर्त्यांचे भाजपा परिवारात स्वागत करण्यात आले. पक्षप्रवेश केलेल्या प्रमुख मान्यवरांमध्ये निलेश भानुसे (वसई शहर समन्वयक), (सुनील मिश्रा- तालुका अधिकारी, युवासेना), प्रकाश देवळीकर (उपतालुका प्रमुख), वैभव म्हात्रे (उपजिल्हा अधिकारी, युवासेना), योगेश भानुसे (उपशहर प्रमुख), संतोष घाग, नितीन ठाकूर - माजी नगरसेवक (वसई -विरार शहर महानगरपालिका), संतोष कनोजिया, दिनेश भानुशाली (बहुजन विकास आघाडीचे पदाधिकारी) आनंद पाटील (सामाजिक कार्यकर्ते), यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी जोशात भाजपा प्रवेश केला. या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, माधवी नाईक, आमदार राजन नाईक, नवनाथ बन, वसई-विरार शहर भाजपा जिल्हा अध्यक्षा प्रज्ञा पाटील, महेंद्र पाटील, सर्व मंडळ अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पक्षप्रवेशाने वसईतील भाजपाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली असून आगामी काळात वसई -विरार शहर महानगरपालिका मध्ये भाजपाला विजयाची संधी आहे.

# वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकीला मिळणार गती

**प्रभाग रचना याद्या गणेशोत्सवात जाहीर होण्याची शक्यता**

प्रतिनिधी
■ वसई

सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भातील याचिका फेटाळत राज्य शासनाला आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मार्ग मोकळा करून दिला आहे. या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहर महानगरपालिकेने निवडणुकीच्या तयारीला गती दिली असून नवीन प्रभाग रचनेनुसार तयार करण्यात आलेल्या याद्या लवकरच राज्य शासनाकडे सुपूर्द होणार आहेत. विशेष म्हणजे गणेशोत्सवाच्या काळात या याद्या प्रसिद्ध करण्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महत्वाचे म्हणजे वसई-विरार महापालिकेचा कार्यकाळ जून २०२० मध्येच समाप्त झाली होता. मात्र त्यानंतर आलेल्या कोरोना महामारीमुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. दरम्यान, नवा प्रभाग आराखडा व त्यानुसार आरक्षण सोडतीसह निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली होती. परंतु ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेमुळे निवडणुकीवर स्थगिती आली. अखेर या याचिका फेटाळून लावण्यात आल्यामुळे राज्यातील सर्वच ठिकाणी निवडणुकांचे वारे पुन्हा वाहू लागले आहेत.

पालिकेच्या सूत्रांनुसार, नवीन प्रभाग रचना तयार करून त्यानुसार याद्या अंतिम केल्या जात असून त्या राज्य निवडणूक आयोगाला एक, दोन दिवसांत पाठवण्यात येणार आहेत. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाचे निरीक्षक वसई-विरारमध्ये येऊन प्रभाग रचनेचे प्रत्यक्ष परीक्षण करतील आणि आवश्यक त्या सुधारणा सुचवतील. त्यानंतरच प्रारूप याद्यांवर हरकती व सूचना मागवण्यात येतील. या प्रक्रियेनंतर प्रभागनिहाय आरक्षण सोडत आणि मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण पूर्ण केले जाणार आहे.ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे दिल्यामुळे वसई-विरार महानगरपालिकेच्या निवडणुकीस आता कायदेशीर गती मिळाली आहे. परिणामी आगामी महिन्यांत दिवाळीपूर्वी किंवा दिवाळीनंतर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुमारे चार वर्षांपासून प्रशासकाच्या अधिपत्याखाली असलेल्या वसई-विरार शहरात पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींमार्फत राजवट स्थापन होणार असून नागरिकांना प्रत्यक्ष लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून त्यांच्या समस्या मांडण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचे निर्णय घेणार - कृषिमंत्री भरणे



■ मुंबई

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असून राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक धोरणे राबविणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. कृषिमंत्री भरणे यांनी मंत्रालयातून कामकाजास सुरवात केली, त्यावेळी ते बोलत होते.कृषिमंत्री भरणे म्हणाले की, मी स्वतः शेतकऱ्याचा मुलगा असून शेती व शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय हाच माझा प्राधान्याचा विषय असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी क्षेत्राचा विकासासाठी निर्णय घेण्यात येतील. कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# कामण, मालजीपाडा, ससूनवघर परिसरात सीएनजीचे वांदे

**शेकडो रिक्षा चालकांवर उपासमारीचे संकट**

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व परिसरात सीएनजी पंपांचा तुटवडा व सुरळीत पंप नसल्याने तसेच सीएनजी अनियमित दराने व अपुऱ्या दराने उपलब्ध असल्याने येथील रिक्षा चालकांवर उपासमारीचे संकट कोसळले आहे. या संदर्भात संबंधित वरिष्ठ स्तरापर्यंत सीएनजी व वीज समस्या सुरळीत करण्या संदर्भात निवेदन देऊनही वर्षभराच्या कालावधीत या निवेदनाकडे कानाडोळा करण्यात आल्याने रिक्षाचालक मालक संघटनेने संताप व्यक्त केला आहे.

नायगाव पूर्वेतील ससूनवघर, मालजीपाडा, कामण या परिसरात लोकसंख्या मोठ्या वेगाने वाढत आहे. येथील रिक्षा चालकांना त्यामुळे चांगला व्यवसाय मिळत आहे. या रिक्षा व्यवसायावरच अनेक नागरिकांचा उदरनिर्वाह भरत आहे. परंतु, सध्या सीएनजी पंपाच्या तुटवड्यामुळे पंपाच्या सुरळीत नसण्याने तसेच विजेच्या समस्येमुळे रिक्षा चालकांना सर्वाधिक फटका बसत आहे. दरम्यान, वारंवार होल्टेज कमी होणे, वीजपुरवठा खंडित होणे, सीएनजी केसकेड भरून देणारी वाहने उपलब्ध नसणे, रिक्षाचालक व नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागणे अशा समस्या या परिसरात निर्माण झाल्या असून या समस्येचे निवारण करण्यासंदर्भात रिक्षाचालक-मालक संघटनेने वर्षभरापूर्वी संबंधित वरिष्ठ स्तरापर्यंत तसेच मुख्यमंत्री व पालघर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. परंतु या निवेदनाची पूर्तता वर्षभराच्या कालावधीनंतर देखील झालेली नसल्याने रिक्षा चालकांनी संताप व्यक्त केला आहे. अनेक रिक्षा चालकांना तर सीएनजी भरण्यासाठी मीरा- भाईंदर परिसर गाठावे लागते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन खर्च होऊन रिक्षाचालकांना आर्थिक भुर्दंड बसत आहे.

दरम्यान, सीएनजी पंपांचा तुटवडा व सीएनजी पंप सुरळीत नसल्याने त्याचा थेट परिणाम रिक्षाचालकांसोबतच प्रवासी व इतर नागरिकांना बसू लागला आहे. याबाबत संबंधित कंपन्यांनी व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी जोर धरू लागली आहे. ससूनवघर, मालजीपाडा परिसरातील स्थानिक रिक्षाचालक-मालक संघटनेतर्फे ही मागणी पुन्हा एकदा लावून धरण्यात आली असून आपल्या अधिकारांसाठी रिक्षाचालक-मालक संघटना आवाज उठवण्याच्या तयारीत आहे.



**मुंबई:**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वार्ड क्रमांक 36 च्या शाखाप्रमुख पदी बाळू बामगुडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांना लालबागच्या राजाची प्रतिमा भेट देऊन शुभेच्छा देताना मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर, समाजसेवक विनोद पाटकर, सोबत बलराज धामरगीता, उद्योजक समीर गुरव, अभय राऊळ, निशा बामगुडे



**मुंबई:** एस.जी.बर्वे नगर म. न. पा.माध्यमिक शाळेत विभाग निरीक्षिका सुनीता खाडे मॅडम यांच्या हस्ते इंग्रजी प्रयोगशाळेचे अनावरण करण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अंबर सिंग मगर ,वरिष्ठ शिक्षक अशोक शेंडे ,सुभाष रजक , मनोज भोकरे ,अर्चना कदम ,त्र्यंबक मोरे उपस्थित होते.प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन इंग्रजी प्रयोगशाळेचा वापर कसा करावा याबाबत बहुमोल असे मार्गदर्शन केले.

# शिवसेनेचे मुंबई उत्तर भारतीय संघटन प्रमुख जयप्रकाश सिंह यांचा वाढदिवस साजरा



**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे उत्तर भारतीय संघटन, मुंबई प्रमुख जयप्रकाश सिंह यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सांताक्रूझ पूर्व वाकोला आराम सोसायटी रोड येथील जयप्रकाश सिंह यांच्या कार्यालयात शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी केक कापून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कलिना शिवसेना विधानसभा प्रमुख दशरथ सतपाल, शाखा प्रमुख संजय तेल्होरे, कलिना उत्तर भारतीय अध्यक्ष देवेंद्र साहू, क्षत्रिय महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ओपी सिंह, दिनेश सिंह, गोपाल गुप्ता, सुनील सिंह, देवेंद्र तिवारी, नरसिंह यादव, फर्स्ट इंडियन इंटरनॅशनल शूटिंग जज पवन कुमार सिंह, इंटरनॅशनल शूटिंग जज धीरज सिंह यांच्यासह शेकडो पक्ष कार्यकर्ते आणि समर्थक उपस्थित होते.

**LOST & FOUND**

Notice is hereby given that Share certificate No. 281 to 285, Cost Rs. 50 Each, against Flat No.B-04(05) of Regency Co.op Hsg Soc.Ltd on the name of Vinay Navinkumar Shah & Mrs.Indiraben Navinkumar Shah has been lost or misplaced by them. Any person who has claim in respect of the said shares should lodge claim with the society secretary., Regency Co.Op. Hsg. soc.Ltd.,Near Swad Hotel, Agashi Road, Virar West, Tal: Vasai, Dist :Palghar on or before 7 days from this date , else society will proceed to issue duplicate share certificate.

Sign/-
Mr.Vinay Navinkumar Shah
Mrs. Indiraben Navinkumar Shah

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना माझ्या अशिल ओमकार तानाजी रेवाळे ह्यांच्या कडुन कळविण्यात येते की गाव मौजे-विरार, विरार (पू), ता वसई, जि पालघर, येथील सर्व्हे नं. ८६, हिस्सा नं. १ ह्या जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली "गोविंद श्रृष्टी अपार्टमेंट", "गोविंद श्रृष्टी कॉ ऑप. हौ सोसायटी लि", विकास नगरी, फुलपाडा रोड, विरार (पू), ता-वसई, जि-पालघर-४०१३०५, ह्या बिल्डिंग मधील रूम नं.१०९, पहिला मजला, बिल्डिंग नं.०५, क्षेत्र ३४५ चौ फुट, सुपर बिल्टिअप हा फ्लॅट दिनांक-१५/०४/२०१३ रोजी रजिस्टर दस्त नं वसई-२-३३७४-२०१३ च्या नुसार १) तानाजी गणपत रेवाळे व २) वनिता तानाजी रेवाळे ह्यांनी मे गोविंद श्रृष्टी बिल्डिर्स अण्ड डेव्हलपर्स ह्यांच्याकडून कायमचा विकत घेतला असून १) तानाजी गणपत रेवाळे व २) वनिता तानाजी रेवाळे हे सदर फ्लॅटचे मालक होते व सदर सोसायटीचे अधिकृत सभासद देखील होते सोसायटी कडून त्यांना शेअर सर्टिफिकेट नं. २६ असे ०५ शेअर असलेले रक्कम रू.१००/- प्रती शेअर १२६ ते १३० पर्यंत दिलेले आहेत तसेच कै तानाजी गणपत रेवाळे हे दिनांक -२१/०२/२०२५ रोजी मयत झाले त्यांच्या पश्चात त्यांना १) वनिता तानाजी रेवाळे (पत्नी), २) श्रृती प्रविण तळेकर (मूलगी), ३) सुहानी सुनील मुडेकर (मूलगी), ४) वर्षा तानाजी रेवाळे (मूलगी), ५) गणेश तानाजी रेवाळे (मूलगा), ६) रोहिनी तानाजी रेवाळे, (मूलगी), ७) ओमकार तानाजी रेवाळे (मूलगा) हे कायदेशीर वारस आहेत तरी आता सदरचा फ्लॅटचे पूर्ण हक्क व अधिकार वरील वारसांचा आहे तरीही सदर फ्लॅट त्यांना त्यांच्या नावावर आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आम्हांस ऑफीस नं. १०२, पहिलामाळा, कुंती सदन, श्री मंगल कार्यालय हॉलच्या खाली, विर सावरकर मार्ग, विरार (पू), ता वसई, जि-पालघर, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावा.

दि. ०६.०८.२०२५ — ॲड. रंजन हाशा पाटील

## वसई-विरार शहर महानगपालिका

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५.
दुरध्वनी २५२५१०५/०९/२५२९८८८/२५२९८९० फॅक्स: ०२५०-२५२५१०७ ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र. ववशिम/प्रससी/जाहि/१२९/२०२५ — दिनांक:- ५/८/२०२५

**वसई विरार महानगरपालिका अधिनियम 1949 चे अधिसुचीतील प्रकरण 8 मधील कलम 1 (1) व 1 (2) अन्वये 469 च्या नुसार जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त झालेल्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिद्धझाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या हरकतीच्या लेखी पुराव्यासह विरार शहर महानगपालिका विभागीय कार्यालयात लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी हस्तांतरण करून महानगरपालिका या बाबतची नोंद घेतली जाईल.**

| अ. क्र. | दिनांक | अनुसूचित दोन / तीन मधील नोटीसीचा प्रकार | कर निर्धारण पुस्तकातील क्र. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे विकणाऱ्यांचे नाव किंवा अभिहस्तांकन करत्याचे नाव | खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन करत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 30/07/2025 | CH01/86/75 | 1 | वक्रतुंड अपा रूम नं. ४९९ गासकोपरी | निवासी | हर्षद उल्हास भुते | रजनी रविंद्र सरदेसाई व रवींद्र शांताराम सरदेसाई |
| २ | 31/07/2025 | CH07/459/17 | 7 | ओम साई चाळ नं ५ नं. ७ चंदनसार | निवासी | रोहित कुमार राममिलन निर्मल | राजकुमारी |
| ३ | 31/07/2025 | CHO4/668 | 4 | कातकरीपाडा चंदनसार | निवासी | बेबीबाई पांडुरंग परेड | लक्ष्मी श्रवणकुमार कागाला |
| ४ | 31/07/2025 | CH06/85/15 | 6 | मोहन झा चाळ कोपरीतलाव | निवासी | मंजुळा नामदेव खाडे | मनिषा नामदेव खाडे |
| ५ | 31/07/2025 | CH02/342/11 | 2 | बाळाराम अपा रूम नं. / १०३ कोपरी | निवासी | सतिश हरिश्चंद्र पाटील | दिक्षा विनोद सिंग |
| ६ | 31/07/2025 | CH07/509 | 7 | कोलादेवी चाळ बरफपाडा भाटपाडा | निवासी | निभा कन्हैय्या झा | नितादेवी सियाराम सिंह व मुकेश कुमार सियाराम सिंह |
| ७ | 31/07/2025 | CHO3/63/2 | 3 | जय अंबे अपा रूम नं. १०२ गासकोपरी | निवासी | सिताबाई रामू वाघमारे | दत्तात्रय रामचंद्र पांचाल सुतार |
| ८ | 31/07/2025 | CH07/07/24 | 7 | आई जिवदानी दर्शन चाळ गाळा नं ०८ बरफपाडा भाटपाडा | निवासी | अरविंद कुमार श्याम नारायण पाल | रवीश कुमार राधे श्याम शर्मा |
| ९ | 31/07/2025 | CH07/755/1 | 7 | सरिता निवास चाळ नं ०१ गाळा नं ए/०७ बरफपाडा बरफपाडा भाटपाडा | निवासी | विशालकुमार लालनसिंह (वचन रघुनाथ बराफ) | श्यामनारायण रामप्रित गुप्ता |
| १० | 31/07/2025 | CH07/732/29 | 7 | श्री हरी बर्फश्वर चाळ चंदनसार विरार पूर्व | निवासी | वरुण रवीद्र झा | मनोज रामपाल प्रजापती व रेणुदेवी मनोज प्रजापती |
| ११ | 31/07/2025 | CH07/732/76 | 7 | श्री हरी बर्फश्वर चाळ बि/०६ बरफपाडा भाटपाडा | निवासी | गीतादेवी सविता देवी | रामभजन अच्छेलाल यादव |
| १२ | 31/07/2025 | CH04/669/2 | 4 | कातकरांपाडा दुर्गानगरचाळ चंदनसार | निवासी | गुलाब गंगाराम विघ्ने | सिमादेवी दिलीप कुमार |
| १३ | 31/07/2025 | CH07/732/75 | 7 | श्री हरी बफेश्वर चाळ अम्बेमाता मंदिर रोड बरफपाडा डी/10 भातपाडा | निवासी | वरुण झा | आरती राकेश विश्वकर्मा व राकेश रामसुख विश्वकर्मा |
| १४ | 31/07/2025 | CH07/755/2 | 7 | सरिता निवास चाळ ए/०६ भाटपाडा बरफपाडा | निवासी | अभिषेक छोटेराम पाल | सुभाष कुमार कनोजिया |
| १५ | 31/07/2025 | CH07/868/9 | 7 | रिद्धी सिद्धी चाळ ए/०९ बरफपाडा भाटपाडा | निवासी | मनीष कमलेश विश्वकर्मा | अविनाश कुमार गोपालदास |
| १६ | 31/07/2025 | CH07/732/74 | 7 | श्री हरी बफेश्वर चाळ चाळ बि/०९ बरफपाडा भाटपाडा | निवासी | पुनम धर्मेंद्र विश्वकर्मा व वरुण झा (बिल्डर्स) | ममता मनोजकुमार वर्मा |
| १७ | 31/07/2025 | CH06/89/15 | 6 | परमात्मस पार्क समारबालाजी कंस्ट्रक्शन ए/101 | निवासी | सुजित एस जाधव | प्रवीण कुमार दाधोच |
| १८ | 31/07/2025 | CH01/161/13 | 1 | श्री गणेश चाळ नं. १ रूम नं. ०३ भाटपाडा | निवासी | सत्यवान सखाराम खबिल | अनिल किसन शेगाले |
| १९ | 31/07/2025 | CH07/782 | 7 | स्वतिक चाळ भाटपाडा बरफपाडा | निवासी | परवेज युसुफ खान | बदना शिवप्रकाश यादव |
| २० | 31/07/2025 | CH07/468/97 | 7 | दत्तागुरु चाळ नं ३ रूम नं ०३ भाटपाडा | निवासी | रमेश राजाराम भेकरे | बंदनादेवी राकेश कुमार |

जावक क्र.व.वि.श.म./आक/ जा.क्र / ६७०/२०२१
दि. २३/१२/२०२१.

सही/-
सहा आयुक्त
प्रभाग समिती सी चंदनसार
वसई-विरार शहर महानगपालिका

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 46
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे**, E-mail: vrittamanas1@gmail.com दुरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ४६
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## अनन्या शेलार 'टीआयजीपी मिस टीन इंडिया'

**मुंबई:** द इंटरनेशनल ग्लॅमर प्रोजेक्ट (TIGP) द्वारा आयोजित टीआयजीपी मिस टीन इंडिया २०२५ (सीझन ४) च्या भव्य समारंभात अनन्या प्रज्ञा रणजित शेलार यांनी फर्स्ट रनर-अपचा किताब पटकावला आहे. ३१ जुलाई २०२५ रोजी मुंबईतील आयटीसी फॉर्च्यून एक्सोटिकामध्ये झालेल्या या ग्रँड फिनालेमध्ये बॉलीवुड अभिनेत्री आणि माजी मिस इंडिया संगीता बिजलानी यांनी विजेत्यांना मुकुट प्रदान केला. द इंटरनेशनल ग्लॅमर प्रोजेक्ट (TIGP) ही भारतातील एक अग्रगण्य आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आणि महिला सक्षमीकरण व्यासपीठ आहे, जी मिस टीन, मिस इंडिया आणि मिसेस इंडिया या प्रवर्गातील स्पर्धकांना प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास आणि आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून देण्यासाठी ओळखली जाते. या मंचाने ५,००० हून अधिक स्पर्धकांमधून केवळ ४० फायनलिस्ट निवडले, ज्यामध्ये अनन्या शेलार यांनी आपली प्रतिभा आणि आत्मविश्वासाने सर्वांचे लक्ष वेधले.अनन्या शेलार यांनी त्यांच्या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले, "टीआयजीपी मिस टीन इंडिया २०२५ ची फर्स्ट रनर-अप होण्याचा मला अभिमान आहे. या प्रवासात माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या टीआयजीपी परिवाराचे, विशेषतः डॉ. स्वारूप पुराणिक सर आणि डॉ. अक्षता प्रभू मॅडम यांचे मी मनापासून आभार मानते. तसेच, माझ्या कुटुंबियांचे, प्रेक्षकांचे आणि मार्गदर्शकांचेही आभार, ज्यांच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले. हे यश तुमच्याशिवाय पूर्ण झाले नसते!"



# पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवासाठी पालिका अधिकाधिक कृत्रिम तलाव उभारणार

### श्रीगणेशोत्सव समन्वयक प्रशांत सपकाळे यांची माहिती

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबई महानगरातील श्रीगणेशोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. गत वर्षी महानगरपालिकेने एकूण २०४ कृत्रिम तलाव उभारून पर्यावरणपूरक उत्सवाला हातभार लावला होता. यावर्षी देखील त्याच धर्तीवर अधिकाधिक कृत्रिम तलाव उभारून मुंबईकरांसाठी पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. मुंबईकरांनी देखील आपल्या आवडत्या बाप्पाचे विसर्जन कृत्रिम तलावात करून पर्यावरणपूरक उत्सवाला हातभार लावावा, असे आवाहन उप आयुक्त (परिमंडळ २) तथा गणेशोत्सव समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबईतील गणेश समन्वय समितीची संयुक्त बैठक परळ येथील 'एफ दक्षिण' विभाग कार्यालयातील सभागृहात पार पडली. त्यावेळी सपकाळे यांनी हे आवाहन केले. उप आयुक्त (पर्यावरण व वातावरणीय बदल) अविनाश काटे, ए विभागाचे सहायक आयुक्त . जयदीप मोरे, बी विभागाचे सहायक आयुक्त नितीन शुक्ला, डी विभागाचे सहायक आयुक्त मनीष वळंजू, 'एफ दक्षिण' विभागाचे सहायक आयुक्त महेश पाटील, जी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त विनायक विसपुते, पी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त कुंदन वळवी, एस विभागाच्या



सहायक आयुक्त अलका ससाणे, आपत्कालीन व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख अधिकारी श्रीमती रश्मी लोखंडे यांच्यासह अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघ, बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती, मुंबई उपनगरे गणेश उत्सव समन्वय समितीचे पदाधिकारी, मुंबईतील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे सदस्य, समन्वय समिती सदस्य यावेळी उपस्थित होते.

या बैठकीत समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विविध महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सूचना समजून घेतल्यानंतर उप आयुक्त प्रशांत सपकाळे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून यंदाच्या श्रीगणेशोत्सवाबाबत सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली

**विविध विषयांवर चर्चा**

सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती सदस्यांनी श्रीगणेशमूर्ती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तसेच इतर समस्या त्वरित मार्गी लावाव्यात, अशी मागणी केली. विसर्जन मार्गावर असलेल्या झाडांच्या वाढलेल्या फांद्यांची छाटणी करावी, मंडळांच्या मंडपाजवळ असलेला कचरा उचलून तेथे उत्सव कालावधीत निर्माल्य कलश ठेवावा, महिला भाविकांसाठी प्रसाधनगृहांची, हिरकणी कक्षाची व्यवस्था करावी, उत्सव कालावधीत खाद्यपदार्थ, मावा, मिठाई आदींमध्ये होणारी भेसळ रोखावी, सार्वजनिक मंडळांना कृत्रिम तलाव निर्माण करण्याबाबत सुविधा द्याव्यात, लोंबकळणाऱ्या केबल्स सुस्थितीत कराव्यात, आगमन आणि विसर्जन मार्गावरील सिग्नलच्या खांबांची उंची वाढवावी, आदी मागण्या केल्या. या सर्व मागण्या यथोचितरित्या मार्गी लावल्या जातील, असे मंडळांना आश्वासित करण्यात आले.

## कबुतरखाना अचानक बंद करणे योग्य नाही!

# पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कंट्रोल फीडिंग, तांत्रिक पद्धतीने स्वच्छता करा !

### मुख्यमंत्र्यांचे निर्देश - मंत्री लोढा यांची माहिती

प्रतिनिधी
■ मुंबई

दादरमधील कबुतर खाना अचानक बंद करणे योग्य नाही या संदर्भात पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कंट्रोल फीडिंग करा, तांत्रिक पद्धतीने स्वच्छता करण्याचे आणि राज्य सरकार व महानगरपालिकेने उच्च न्यायालयात ठाम भूमिका मांडावी, असे निर्देश देखील फडणवीस यांनी दिले आहेत. असे या संदर्भात झालेल्या बैठकीनंतर मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

राज्य सरकार व मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने कबुतर खाने बंद करण्यास सुरुवात केली आहे. दोन दिवसांपूर्वीच दादर येथील प्रसिद्ध कबुतर खाना बंद करण्यात आला आहे. तसेच न्यायालयाने कबुतरांना दाणे टाकणाऱ्यावरही निर्बंध घातले आहेत. त्यामुळे कबुतरांची उपासमार सुरू झाली आहे. दादरमध्ये सर्वत्र कबुतरे आसरा शोधत असताना व काही कबुतरे आजारी पडले असल्याचे दृश्य दिसत आहे. कबुतर खाना बंद केल्याच्या निषेधार्थ जैन समाजाने मोठे आंदोलनही केले.

समाजातील लोकांची भावना लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा समतोल निर्णय घेतला आहे. कबुतरांना अन्न टाकल्याने आरोग्याची समस्या निर्माण होत असेल तर आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून फीडिंग आणि साफसफाई करण्यात यावी.तसेच एकाही कबुतराचा मृत्यू व्हायला नको, असे निर्देश देखील मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. शास्त्रोक्त पद्धतीने कबुतरांचे फीडिंग आणि मशीनद्वारे स्वच्छता, साफसफाई करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्र्यांनी दिले असल्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

नागरिकांचे जीवन देखील सर्वात महत्त्वाचे आहे. त्या दृष्टिकोनातून लोकांच्या जीवनाचे महत्त्व सर्वात जास्त आहे. मात्र, त्याबरोबर कबुतराचा मृत्यू देखील व्हायला नको. यासाठी काही शास्त्रोक्त पद्धती असते. त्याचा अवलंब करण्याचे आदेश देखील मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा मान ठेवला**

लोकांची भावना आणि शंभर वर्ष जुनी परंपरा लक्षात घेऊन या संदर्भातले महत्त्वाचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याचे या संबंधी आवाज उठवणारे गिरिश महाजन यांनी म्हटले आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा मान ठेवून एकही कबुतर मृत होऊ नये, यासाठी एकत्र प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. याचा आम्हाला आनंद झाला असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

## कमला मिलच्या 'लिव्हिंग लिक्विडस्'वर पालिकेचा हातोडा

**मुंबई:** लोअर परळ येथील कमला मील परिसरामध्ये स्थित असलेल्या 'लिव्हिंग लिक्विडस्' या आस्थापनेतील अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन त्यांचे उपाहारगृहांचे दोन्ही परवाने रद्द करण्याची कठोर कारवाई बृहन्मुंबई महानगरपालिकेने काल केली आहे. तळमजला आणि पहिल्या



मजल्यावर गारमेंट शॉपच्या ऐवजी रेस्टॉरंट बार व वाईन शॉप आणि तळमजल्यावर टेलरिंग शॉपऐवजी रेस्टॉरंट आणि डायनिंग असा बदल करुन अनधिकृतरितीने कार्यरत असलेल्या 'लिव्हिंग लिक्विडस्' यांना पालिका प्रशासनाने ही कारवाई करुन दणका दिला आहे. कमला मील परिसरातील आयटी पार्कच्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण तसेच अनधिकृतरित्या रेस्टॉरंट, पब आणि बार सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्याठिकाणी स्थळ निरिक्षण करुन कारवाई करण्याचे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले होते.



**मुंबई : शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्ते पदी शायना एन. सी. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच त्या बाळासाहेब भवन येथे उपस्थित झाल्या त्यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना शिवसेना दक्षिण मुंबई विभाग प्रमुख दिलीप नाईक. या प्रसंगी उपविभाग प्रमुख प्रथमेश शाह, शाखाप्रमुख निलेश भोईटे आणि संतोष पवार उपस्थित होते.**

### प्रियकराशी शरीरसंबंध ठेवताना प्रायव्हेट पार्टला दुखापत

# दादर रेल्वे पोलिसांकडे बलात्काराचा कांगावा, पोलिसांनी 'सीसीटीव्ही'च्या मदतीने शोधले सत्य

प्रतिनिधी
■ मुंबई

३० वर्षीय महिला प्रवाशाने धावत्या रेल्वेत लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप केला होता, मात्र रेल्वे पोलिसांच्या तपासात ही तक्रार खोटी असल्याचं समोर आलं आहे. प्रियकरासोबत शारीरिक संबंध ठेवताना तरुणीच्या प्रायव्हेट पार्ट्सना दुखापत झाली होती. मात्र हे लपवण्यासाठी तिने ट्रेनमध्ये बलात्कार झाल्याचा कांगावा केला होता.

३० वर्षीय तरुणीने हॉस्पिटल प्रशासनाला सांगितलं होतं की, तिच्यावर धावत्या रेल्वेमध्ये लैंगिक अत्याचार झाला. त्यामुळे रेल्वे पोलिसांनी एफआयआर दाखल केला. परंतु तपासात महिलेने दिलेली माहिती खोटी असल्याचे समोर आले. जीआरपी आता हे प्रकरण बंद करणार आहेत.13 जुलै रोजी एका सरकारी हॉस्पिटलने दादर रेल्वे पोलिसांना माहिती दिली, की एका महिलेला तिच्या खासगी भागांना जखम झाली आहे. पोलिसांनी महिलेला विचारले असता, तिने सांगितले की ती प्रयागराजहून मुंबईला गोरखपूर एक्सप्रेसने येत होती. ती जनरल कोचमधून प्रवास करत होती. ट्रेनमध्ये टॉयलेटला गेली असताना, एक अनोळखी माणूस आत शिरला. त्याने दरवाजा बंद करुन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

महिलेने पोलिसांना सांगितले की, "माझी इच्छा नाही की मी औपचारिक तक्रार दाखल करावी, कारण त्यामुळे माझी बदनामी होईल." परंतु पोलिसांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला. एका एनजीओच्या सदस्यांना बोलावून तिची समजूत काढली. शेवटी, महिलेने तक्रार करण्यास नकार दिल्यानंतर पोलिसांनी स्वत:हून एफआयआर दाखल केला.पोलिसांच्या टीमने अनेक स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तिने सांगितलेल्या ठिकाणांना भेट दिली. तपासात असे दिसून आले की, ती तिच्या प्रियकरासोबत मुंबईला आली होती. 12 जुलै रोजी त्यांनी एका गेस्ट हाऊसमध्ये चेक इन केले. तिथे दोघांमध्ये शारीरिक संबंध झाले. त्यामुळे तिच्या खासगी भागाला जखम झाली आणि तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. महिलेने तिच्या प्रियकराची ओळख लपवण्यासाठी खरी गोष्ट सांगितली नाही, असे पोलिसांनी सांगितले. उपचारानंतर ती तिच्या गावी परतली. तक्रार खोटी आहे, यावर शिक्कामोर्तब करण्यापूर्वी तिच्याशी बोलल्याचं पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी सांगितलं की, महिलेने प्रियकराला वाचवण्यासाठी खोटी तक्रार दाखल केली. त्यामुळे जीआरपी आता हे प्रकरण बंद करणार आहे. महिलेने दिलेली माहिती आणि तपासात समोर आलेली माहिती यात खूप फरक आहे. त्यामुळे पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत सत्य शोधून काढलं.

# बेस्ट उपक्रमाच्या वसाहती कोणत्याही खाजगी कंपन्यांना भाडेतत्वावर देऊ नका - सुहास सामंत

प्रतिनिधी
■ मुंबई

गेल्या काही दिवसांपासून अनेक वृत्तांमध्ये बेस्ट उपक्रमाच्या खंबाटा हिल, कुलाबा अश्या महत्वाच्या, सुरक्षेच्या दृष्टीने, सेवेच्या दृष्टीने फार वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचारी वसाहती या टेंडर काढून भाडेतत्वावर देण्याबाबतची माहिती मिळते.बेस्टची आर्थिक परिस्थिती ही अतिशय वाईट आहे. पण अश्या माध्यमातून बेस्टला पैसे मिळवून देण्याबाबत घेण्यात आलेला बेस्टचा निर्णय चुकीचा आहे.

हा विषय अतिशय गंभीर असून आपण यात मध्ये स्वतः लक्ष घालून सदर निर्णय तत्काळ रदद् करण्यासाठी सूचना द्याव्यात अशी विनंती कामगार नेते सुहास सामंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.तसेच बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती कशी सुधारण्यात येईल याबाबत आमच्याकडे काही उपाययोजना आहेत. मी वारंवार आपणास पत्र देऊन आपल्याकडे बैठक मागत आहे. पण गेले वर्ष झाले आपण एकदाही आम्हाला बैठक दिली नाही. त्यामुळे बेस्टच्या योग्य नियोजनासाठी आपण आम्हांला बैठकीसाठी तारीख वेळ द्यावी अशीही ही विनंती सामंत यांनी केली आहे.

दरम्यान, सदर वसाहती मुंबईकर जनता, तसेच कुलाबा ए विभागात, मंत्रालय, विधानभवन, अनेक महत्वाची सरकारी कार्यालये, रूग्णालये त्यांना तातडीने सेवा मिळावी, तसेच मुंबई बेस्टच्या हददीत असलेल्या प्रत्येक विभागात मुंबईकर जनतेस तातडीची योग्य सेवा तत्पर मिळावी यासाठी या वसाहती बांधण्यात आलेल्या आहेत. आताच मुंबई महानगरपालिकेतर्फे जाहीर करण्यात आलेल्या विकास आराखडा सन २०३४ मधील नियमानुसार या विद्युत वीज संग्राहक केंद्राजवळील जागा वसाहती या अत्यावश्यक आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी राखीव ठेवाव्या हा नियम असताना देखील बेस्ट उपक्रमाकडून या वसाहती भाडेतत्वावर देण्यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. ते योग्य नाही. असेही सामंत यांनी नमूद केले आहे.

**मुंबई :** शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) घाटकोपर पूर्व विधानसभेच्या वतीने सहाय्यक आयुक्त एन वॉर्ड आणि पंतनगर पोलीस ठाणे यांना घाटकोपर पूर्व मधील कबूतरखाने तातडीने बंद करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा जनआंदोलन करु असा इशारा निवेदन देण्यात आले. या प्रसंगी उपविभागप्रमुख अजित गुजर, अजित भायजे, विधानसभा संघटक अशोक वांडेकर, प्रसाद कामतेकर, विधानसभा कार्यालय प्रमुख प्रकाश वाणी, नरेश माटे, सत्यवान कवळे, हृदयनाथ राणे, लालजी निशाद, दिलीप पवार, विकास तायडे, शाखाप्रमुख विशाल चावक, जितेंद्र परब, सुनिल भोस्तेकर, सचिन भांगे, संतोष पिंगळे, सतीश पवार, दिनकर मांडले, रमेश सावंत, वसंत पाटील आणि शिवसैनिक मोठ्या संखेने उपस्थित होते.



# निवडणूक आयोगाने 18 वय पूर्ण करतील त्यांचेच नाव मतदार यादीत घ्यावे व त्यांना मतदानाचा हक्क द्यावा

प्रतिनिधी
■ मुंबई

निवडणूक आयोगाने तारखेचा घोळ घालत न बसता आचारसंहिता जाहीर होण्याआधी एक तारीख निश्चित ठरवून त्या तारखेपर्यंत जे युवक /युवती वयाची १८ वर्षे पूर्ण करतील त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करुन त्यांना मतदानाचा हक्क मिळवून दिला तर ती बाब उचीत होईल.जाणून आपल्या यापुर्वीच्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती दक्षिण मुंबई जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रविकांत बावकर यांनी राज्य निवडणूक आयोगाला केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीसाठी यापूर्वी १ जानेवारी यादिवशी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवयुवक/युवतींना मतदार नोंदणी करुन मतदानाचा हक्क दिला जात असे. पण गेल्या दोन वर्षापासून आयोगाने १ जानेवारी / १ एप्रिल / १ जुलै १ ऑक्टोबर या दिवशी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवक / युवतींना मतदान करण्याचा अधिकार दिला होता. त्याकरिता अनेक महाविद्यालयात जाऊन युवक / युवतींशी संपर्क करुन त्यांना मतदार करुन घेतले होते.

परंतु नुकताच निवडणूक आयोगातर्फे जाहिर करण्यात आलेल्या आदेशानुसार १ जुलै २०२५ रोजी मतदान यादीत समाविष्ट असलेल्या मतदारानाच मतदान करण्याचा हक्क प्राप्त होणार आहे. त्यामुळे १ जुलै २०२५ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवक युवतींना मतदान करता येणार नाही. निवडणूक आयोग त्यांचा मतदानाचा हक्क हिरावत आहेत. असे रविकांत बावकर यांनी म्हटले आहे.

**श्री जरंडेश्वर सहकारी पतसंस्था मर्यादित**
नोंदणी क्रमांक.: बीओएम/डब्ल्यु-आर/आरएसआर/सीआर/९३४६/सन २००२.
अभिमान श्री को-ऑप. हौ. सो. लि. प्लॉट नं. ३१२/४१,
सेक्टर क्र. ०३, चारकोप, कांदीवली (प.) मुंबई-४०००६७.

जा.क्र. श्री.ज.स.प.म/वा.स.स.नो/२०२५ दिनांक ०४/०८/२०२५

**२३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१०/८/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री हणमंत भगवान फाळके यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर हजर रहावे हि विनंती.

**सभेपुढील विषय.....**

१. दि. ३०/०९/२०२४ रोजी झालेल्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ३१ मार्च २०२५ अखेरच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३. सन २०२४- २०२५ सालाचा वैधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल वाचून मंजुर करणे.
४. सन २०२४ - २०२५ सालाच्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
५. सन २०२५-२०२६ सालाकरीता वैधानिक व अंतर्गत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
६. सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षणातील दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.
७. श्री जरंडेश्वर सहकारी पतसंस्था ही लोकशांती को ऑप क्रे सोसायटीमध्ये निलीनीकरणास मंजुरी देणे
८. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने येणारी इतर कामे.

ठिकाण : मुंबई
दिनांक २१/०७/२०२५

सही /-
कार्यकारी मंडळाच्या संमतीने
उपाध्यक्ष श्री. दिलीप अरूण निकम

**विशेष सुचना :** १) गणसंस्थे अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल. त्यावेळी गणसंस्थेचे बंधन राहणार नाही. २) ज्या सभासदांना अहवालासंबंधी काही प्रश्न किंवा सुचना करावयाच्या असतील त्यांनी दिनांक ०७/०८/२०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात संस्थेच्या कार्यालयात आणून द्याव्यात.

श्री जरंडेश्वर सहकारी पतसंस्थ मर्यादित

# सोशल मिडीयावर बाबासाहेबांविषयी आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यांना अटक

### भीम आर्मीकडून पोलीसांचे अभिनंदन



प्रतिनिधी
■ मुंबई

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच मुस्लीम धर्मा विषयी सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकून कायदा व सुव्यवस्था बिघडवू पाहणा-या राज्याबाहेरील दोन आरोपींना नैहरू नगर पोलीसांनी बेड्या ठोकल्या आहेत. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे.दरम्यान झालेल्या या कारवाईबद्दल भीम आर्मीने पोलीसांचे अभिनंदन केले आहे.

परभणी येथील भन्ते सारीपुत्त यांनी जात बौध्द, धर्म बौध्द लिहा हा वॉट्सअप ग्रूप तयार केला होता .सदर ग्रूपची लिंक त्यांनी सोशलमिडीयावर शेअर केली असता,या लिंकचा आधार घेत संतोषकुमार संगम वय ४३ झारखंड,अंकीत वर्मा वय १८ मध्य प्रदेश व नरेंद्र परायण सिंग वय ४० बिहार, हे तिघे या ग्रूपवर सहभागी झाले .सदर आक्षेपार्ह पोस्टबाबत भीम आर्मी या संघटनेचे कार्यकर्ते सुनील वाकोडे यांनी स्थानिक नेहरू नगर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार करीत आरोपींवर कडक कारवाईची मागणी केली होती.

दरम्यान नेहरूनगर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अंकुश खेडकरयांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राजेंद्र ठीकेकर यांनी या प्रकरणी कसोशीने तपास केला असता सिम कार्ड आणि मोबाईल बदलत, पोलीसांना सतत हुलकावणी देणा-या संतोषकुमार संगम व अंकीत वर्मा या दोन आरोपींना अटक केली.यातील तिसरा आरोपी नरेंद्र परायन सिंग हा मृत झाला असल्याचे पोलीसांनी सांगितले. पोलीसांनी केलेल्या कारवाई नंतर पोलीस निरीक्षक राजेंद्र ठीकेकर यांचे भीम आर्मीचे मुंबई अध्यक्ष अविनाश गरूड ,चेंबूर तालुका अध्यक्ष प्रवीण भोसले,सुनील वाकोडे संजय बचाटे यांनी भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

## महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती, औ.वि.केंद्र परळी-वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम/ बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३०००००६०६०७ (आर) | वर्क ऑफ रिपेयर अ‍ॅण्ड रिकंडिशनिंग ऑफ एफडी फॅन इंपेल्लर हब असेम्ब्ली ड्यूरिंग एओएच अ‍ॅट यू-८, बीएम-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वैजनाथ. | १६.९० लाख २०४००/- | ०७.०८.२०२५ ते ११.०८.२०२५ | १२.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००००६०५५४ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ कंट्रोल कॅबिनेट पॅनल फॉर मोटोराइज्ड ऑपॅरेटेड एक्चूऐटर्स ड्यूरिंग एओएच फॉर ईटी यू-८, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.२० लाख १०७००/- | ०७.०८.२०२५ ते १२.०८.२०२५ | १३.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००००६०५६९ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ जेट पंप अँड हायड्रोजेक्टर सिस्टिम स्पेयर पार्ट्स फॉर वेट कोर्सेस अ‍ॅश इव्हॅक्युएशन अँड कन्व्हेइंग सिस्टिम ड्यूरिंग सीओएच अ‍ॅट एएचपी यू-८, २५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै | ८.२१ लाख ११७१६/- | ०७.०८.२०२५ ते १७.०८.२०२५ | १८.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००००६०१४८ | रीपेरिंग ऑफ हायड्रोलिक सिलेंडर्स इंस्टॉलड अ‍ॅट वेगण टिपलेर क्लॅंपिंग सिस्टिम अ‍ॅट सीएचपी-२, २५०मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ७.६८ लाख १११८०/- | ०७.०८.२०२५ ते २८.०८.२०२५ | २९.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००००६०३१३ | टू ईयर वर्क कॉंट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस ऑफ बस फॉर मूवमेंट ऑफ ओ अँड एम ऑन डेलि हायर बेसिस ऑफ यू-६/७ अ‍ॅट सीएचपी-१, २५०मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | २३३.५५ लाख २३७०५२/- | ०७.०८.२०२५ ते २८.०८.२०२५ | २९.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००००६०३२४ | वन ईयर कॉंट्रॅक्ट फॉर झेरॉक्सिंग ऑफ ऑफिस डॉक्युमेंट्स इन ए-४ अँड ए-३ साइज पेपर्स अ‍ॅट अ‍ॅडमीन बिल्डिंग टीपीएस, परळी वै. | ५.४७ लाख ८९७७/- | ०७.०८.२०२५ ते २८.०८.२०२५ | २९.०८.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००००६०४१२ | प्रोव्हायडिंग टू ईयर्स सर्विसेस ऑफ कंपाऊंडर अ‍ॅट डिस्पेंसरी , टीपीएस, परळी वै. | १८.६५ लाख २२१५७/- | ०७.०८.२०२५ ते २८.०८.२०२५ | २९.०८.२०२५ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ : ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे. सर्व निविदा करिता निविदा किंमत रु.११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती : मुख्य अभियंता, टीपीएस परळी -वैजनाथ, मेल आय डि-parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या : https://eprocurement.mahagenco.in SRM help desk Email ID - etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक - ८४११९७१५२५

मुख्य अभियंता

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र. उप मुख्य अभि./एस. ओ./टीआर./९५६ दि. ०४.०८.२०२५**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मलनिःसारण प्रचालन |
| उप विभाग | उप मुख्य अभि. (एस.ओ.) टीआर/ कार्य. अभि. (प्रापण) एस. ओ. |
| निविदा क्र. | ०२/२०२५-२६ |
| ई-निविदा आयडी क्र. | २०२५_एमसीजीएम_१२०७१३८_१ |
| विषय | मुख्य अभि. (मलनिःसारण प्रचालन) विभागाच्या अंतर्गत अनुभागांसाठी आवश्यक एसकेएफ बनावटीच्या बेअरिंग्जचा पुरवठा. |
| निविदा विक्री | पासून: ०६.०८.२०२५ रोजी स. ११.०० वा. पर्यंत : २६.०८.२०२५ रोजी सायं. ०४.०० वा. पर्यंत |
| संकेतस्थळ | https://mahatenders.gov.in |
| संपर्क व्यक्ती | |
| ए) नाव | श्रीमती स्मिता झोरे, सहा. अभियंता (प्रापण) म. प्र. |
| बी) मोबाईल क्र. | ९९८७१७३००७ |
| सी) ई-मेल आयडी | Seproc01.so@mcgm.gov.in |

**बोली सादरीकरण आणि बोली उघडण्याच्या दिनांकामध्ये जर काही बदल असल्यास आणि स्पष्टीकरणामध्ये काही फेरफार असल्यास बृमनपाद्वारे आवश्यक जोडपत्र / शुद्धिपत्रक जारी करण्यात येईल. ते बृमनपाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल.**

पीआरओ/१२११/जाही/२०२५-२६

सही/-
कार्यकारी अभियंता (प्रापण)
मलनिःसारण प्रचालन आय/ सी

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

कोठ्यावरची वेश्या आणि विकल्या गेलेल्या पत्रकाराची किंमत सारखीच असते. पण त्यातही वेश्येची इज्जत नक्कीच जास्त असते.



- सादत हसन मंटो
हिंदुस्थानी लेखक

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, ६ ऑगस्ट २०२५

# सामना शहरीकरणाच्या लाटेचा

आपला देश आज एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. औद्योगिक युगापासून माहिती युगाकडे झालेल्या संक्रमणामुळे, अमेरिका आणि चीनमधील महासत्तेच्या प्राधान्यासाठीचा संघर्ष आणि भारताचे स्वतःच्या विकास प्रवासात सध्याचे स्थान यामुळे जागतिक व्यवस्थेत दीर्घकालीन बदल झाले आहेत, ज्यामुळे देशाला एक महान परिवर्तन घडवून आणण्यासाठी एक अद्वितीय क्षण निर्माण झाला आहे जो त्याला जगाच्या नेत्यांमध्ये स्थान देईल. अशा महान परिवर्तनामुळे जगाला अधिक शांततापूर्ण, समृद्ध, मुक्त आणि शाश्वत समाज आणि अर्थव्यवस्थेसाठी एक टेम्पलेट प्रदान करणे आवश्यक असू शकते, जे पर्यावरण आणि इतर जागतिक सामान्य तसेच जागतिक संबंधांचे व्यवस्थापन करण्यासाठी दयाळू आणि व्यावहारिक उपाय प्रदान करते. सध्या भारतातील शहरी लोकसंख्येपैकी जवळजवळ एक चतुर्थांश झोपडपट्ट्यांमध्ये राहत असल्याने, अशा कोणत्याही परिवर्तनाची सुरुवात करण्याची आवश्यकता वाढत्या प्रमाणात वाढत आहे. भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे आर्थिक उदारीकरणामुळे निर्माण झालेल्या शहरीकरणाच्या लाटेचा सामना करणे. अंदाजे ३० भारतीय दर मिनिटाला ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर करतात आणि पुढील ३० वर्षांत एकूण ४१६ दशलक्ष लोक तेथे स्थलांतरित होतील असा अंदाज आहे. दुर्दैवाने असे दिसून येते की, येथील प्रमुख महानगरे आणि टियर-२ शहरांना लोकांच्या ओघाचा सामना करणे कठीण होत आहे. भारताच्या प्रसिद्ध कमकुवत पायाभूत सुविधांवर अति ताण आहे हे आश्चर्यकारक नाही. परिणामी, अपुरी सुसज्ज शहरी व्यवस्था आणि झोपडपट्ट्या म्हणजे अनौपचारिक गृहनिर्माण गेल्या काही दशकांत स्वच्छता, आरोग्यसेवा, शिक्षण आणि कायदा आणि सुव्यवस्था यासारख्या मूलभूत सेवांमध्ये योग्य प्रवेश न मिळाल्याने वेगाने वाढले आहे. जरी ते बहुतेकदा उद्योजकीय क्रियाकलापांनी भरलेले असले तरी, तरीही ते शहराच्या मानवी संसाधनांचा आणि जमिनीचा अकार्यक्षम वापर आहेत. या गतिमान शहरी लोकसंख्येच्या उत्पादक क्षमतेचा खऱ्या अर्थाने वापर करण्यासाठी, भारताला मोठ्या आणि वाढत्या संख्येने नवीन रहिवाशांना निवास, काळजी, रोजगार आणि एकत्रित करण्यास सक्षम अशा स्केलेबल शहरी प्रणाली तयार करण्याची आवश्यकता असेल. अर्थातच, या आव्हानात भारत एकटा नाही. मेक्सिको, ब्राझील आणि आफ्रिकेत जगातील काही सर्वात मोठ्या झोपडपट्ट्या आहेत. झोपडपट्टयांच्या असाधारण सेंद्रिय वाढीचा दर पाहता २०५० पर्यंत जगातील ६८% लोकसंख्या शहरी केंद्रांमध्ये राहण्याची अपेक्षा आहे. या समस्येवर साधे उपाय आहेत की नाही हे स्पष्ट नाही आणि झोपडपट्ट्या सोडवण्यासाठी शहरांच्या रचनेचा आणि त्यांच्या सीमांचा तसेच ग्रामीण भागांच्या भूमिकेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. भारतासाठी अशा अनेक कठीण परिवर्तन आणि सुधारणांप्रमाणेच, आव्हान म्हणजे आवश्यक असलेल्या बदलाची पातळी अंमलात आणण्यासाठी त्याच्या भागधारकांच्या राजकीय इच्छाशक्ती आणि एकत्रित प्रयत्नांना एकत्रित करू शकते का? भारतातील शहरांमधील २४ टक्के शहरी लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते असे ताज्या आकडेवारीवरून दिसून येते. सध्याचा शहरीकरणाचा दर जवळजवळ ३५% पाहता, मुंबई आणि हैदराबाद सारख्या मोठ्या महानगरांमधील झोपडपट्ट्या सर्वात प्रसिद्ध आहेत, परंतु अनेक प्रकारे, भारतातील लहान शहरांमध्ये शहरी गृहनिर्माण परिस्थिती अधिक वाईट आहे. भारतातील झोपडपट्ट्यांपैकी जवळजवळ दोन तृतीयांश लोकसंख्या या लहान शहरांमध्ये आहे जिथे दहा लाखांपेक्षा कमी लोकसंख्या आहे. पाच शहरांमध्ये, एकूण शहरी कुटुंबांमध्ये झोपडपट्ट्यांमधील कुटुंबांचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे. आज, जगातील लोकसंख्येपैकी ३४% लोक शहरांमध्ये राहतात. हा आकडा २०५० पर्यंत ६८% पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे, म्हणजेच ४० वर्षांपेक्षा कमी कालावधीत जागतिक शहरी लोकसंख्या जवळजवळ दुप्पट होईल. दर मिनिटाला अंदाजे ३० भारतीय ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरित होतात आणि पुढील ३० वर्षांत एकूण ४१६ दशलक्ष लोक तेथे स्थलांतरित होतील असा अंदाज आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे भारतातील मोठ्या शहरांच्या सीमेवरील झोपडपट्ट्यांमध्ये सुमारे ११० दशलक्ष लोक राहतात. या दाट आणि अनधिकृत झोपडपट्ट्यांना या शहरांच्या अविभाज्य आणि राहण्यायोग्य भागांमध्ये रूपांतरित करण्याचे आव्हान भारतासाठी महत्त्वाचे आहे. कारण भारत आर्थिक आणि भू-राजकीयदृष्ट्या वाढत आहे. अलीकडेच आलेल्या एका अहवालानुसार भारताच्या झोपडपट्ट्यांच्या परिवर्तनाचा विचार करण्यात आला. या अहवालात असे आढळून आले की देशाची ऐतिहासिक गरिबी, जलद परंतु असमान विकास आणि शहरीकरण यांच्या संयोजनामुळे भारताची झोपडपट्ट्यांची समस्या आणखी वाढण्याचा धोका आहे, त्याची शहरे त्यांच्या लोकसंख्येच्या वाढीचा सामना करू शकत नाहीत आणि वाढत्या संख्येने नागरिकांना स्वच्छता, आरोग्यसेवा, शिक्षण आणि कायदा आणि सुव्यवस्था यासारख्या मूलभूत सेवा प्रदान करू शकत नाहीत. त्यावेळी, हे स्पष्ट होते की भारतातील झोपडपट्ट्यांच्या समस्येवर कोणतेही सोपे उपाय नव्हते कारण जगातील काही सर्वात दाट लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्पांसह शहरी भागात मूलभूत पुनर्रचना आवश्यक होती. गेल्या सात वर्षांत भारतासाठी बरेच काही बदलले आहे. मध्यंतरीच्या काळात भारताची अर्थव्यवस्था जवळजवळ दुप्पट झाली आहे आणि निर्माण झालेल्या गुंतवणुकीमुळे आणि संपत्तीमुळे त्याचे शहराचे स्वरूप बदलले आहे. आज मुंबईसारख्या शहराची अनेक ठिकाणी होत आहे असे चित्र दिसते. त्यातच विकास आणि प्रगतीच्या वाटा विस्तारत आहेत. त्यामुळे जुन्या आणि नवीन मुंबईला जोडणारा समुद्री मार्ग, संपूर्ण जिल्ह्यांमध्ये ऑफिस टॉवर्स, शॉपिंग मॉल्स आणि शहराच्या मध्यभागी देखील निवासी गगनचुंबी इमारती आहेत. मुंबईत बॉलीवूड शैलीचे नवीन ग्लॅमरस विमानतळ देखील आहे आणि त्याचे नवीन पूल, रस्ते आणि स्टायलिश बुटीक असलेले जिल्हे देशाच्या वाढत्या आकांक्षांकडे निर्देश करतात. नवीन आणि जुने एकमेकांच्या शेजारी राहतात आणि मुंबईच्या झोपडपट्ट्यांपासून फार दूर नाहीत ज्या आकारात वाढतच आहेत, कारण त्यांच्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा आणि भारताच्या उदयादरम्यान ते भारतासमोर असलेल्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आव्हानांची सतत आठवण करून देतात. आज जागतिक शहरवासीयांमध्ये, जवळजवळ एक अब्ज लोक झोपडपट्ट्या मानल्या जाणाऱ्या भागात राहतात. शहरे ग्रामीण लोकसंख्या आणि आर्थिक संधी शोधणाऱ्या लोकांना आकर्षित करत राहिल्याने, शहरी वातावरणातील झोपडपट्ट्यांचा वाटा निश्चितच वाढत राहील, विशेषतः जलद विकसनशील आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये जिथे शहरीकरणाचा दर शहरी प्रणालींच्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. एका माहीतीच्या आधारे पुढील तीस वर्षांत ४१६ दशलक्ष अतिरिक्त लोक शहरांमध्ये स्थलांतरित होण्याचा अंदाज असल्याने, भारत दर १८ महिन्यांनी एका नवीन मुंबईच्या समतुल्य शहराची निर्मिती करत आहे. ही शहरीकरणाची घटना थांबवता येणार नाही असे दिसते. जोपर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा सापेक्ष आकार आणि शक्ती आणि तिच्या संपत्तीचे वितरण या बदलापेक्षा मोठ्या फरकाने पुढे जात नाही, तोपर्यंत भारताच्या उदयामुळे त्याच्या बहुसंख्य नागरिकांचे जीवनमान चांगले होणार नाही. जर भारताचे राजकारणी आर्थिक आघाडीवर कामगिरी करण्यात अपयशी ठरले, तर काठावर राहणाऱ्या आणि केंद्रस्थानी राहणाऱ्यांमध्ये तफावत वाढेल. भारतातील एका विशिष्ट वर्गात असे मानले जाते की राष्ट्राची धार्मिक मूल्ये सामाजिक अशांतता रोखतात, परंतु जर सरकार कामगिरी करण्यात अपयशी ठरले तर झोपडपट्टीत राहणाऱ्या ६५ दशलक्ष लोकांच्या संयमाची परीक्षा होऊ शकते. एकूणच स्थलांतर आणि समस्या हा विषय येत्या काही काळात चिंतेचा बनू शकतो.

# रमीराज्याचा राडा पत्त्यांच्या दुनियेत मंत्रीपदांची बादशाही!





### "खेळो रमी और जीतो मंत्रालय!", महाराष्ट्राच्या राजकारणातील नवीन टेंडर

महाराष्ट्राच्या लोकशाहीच्या मुख्य मंदिरात अलीकडेच असा रमीचा डाव रंगला की पत्तेच नव्हे तर मंत्रीपदांचे डावपेचही उघडे पडले. साहेबांना शेतकऱ्यांच्या अश्रूंनी नव्हे तर रमीच्या पत्त्यांच्या शाईने मंत्रिमंडळाचा हिशेब रंगवायचा होता. “बियाणं पेरलं नाही तरी चालेल, पण डाव पेरायला वेळ हवा!” या तत्वज्ञानावर चालणाऱ्या कृषिमंत्र्यांनी ऑनलाइन रमीमध्ये इतके रममाण झाले की शेवटी मंत्रालयानेच त्यांना “रमी मंत्रालय” बहाल केले. आता महाराष्ट्रातील राजकीय समीकरण नवे आहे – "खेळो पत्ते, जिंका मंत्रालय, आणि हरलात तर क्रीडामंत्री बनून किमान रमीला तरी राष्ट्रीय खेळाचा दर्जा मिळवा!"

**राजन पारकर**

### सरकारी बाबूंचा गेमिंग प्रपंच "फाईल की फसवणूक, पत्त्यांची मज्जा!"

साहेबांचा डाव पुरता उघडायच्या आत सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा पत्तेवाला पराक्रम समोर आला. भद्रावती पंचायत समितीचे कार्यालय – जिथे जनता रांगेत उभी राहून “साहेब, काम कधी होईल?” असा सवाल करत होती, तिथे साहेब संगणकावर बसून पत्त्यांच्या डावात रंगलेले! “जनतेच्या अर्जाचा पत्ता हरवला तरी चालेल, पण माझ्या पत्त्याचा डाव चुकू नये!” हा त्यांचा बाणा होता. एका स्थानिक युवकाने मोबाईलवर हा कारनामा टिपला आणि सोशल मीडियावर फेकला. आता जनता विचारते, "हे शासकीय कार्यालय आहे की डिजिटल कॅसिनो?"

गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ म्हणाले, “हा प्रकार गंभीर आहे, कारवाई होईल,” पण कारवाईचा पत्ता सरकारी फाईलमध्ये कुठेतरी हरवेल, हे लोकांना चांगले ठाऊक आहे.

### लोकशाही की "लोकशरम"?

मंत्री असोत वा कर्मचारी, पत्त्यांचा हा नवा खेळ लोकशाहीत थाटाने सुरू आहे. नागरिकांची कामे थंडपणे शिल्लक राहतात, आणि संगणकाच्या स्क्रीनवर *“तिन पत्ती”*चे थरारक सामने रंगतात. अशावेळी जनता विचारते – "लोकशाहीच्या मंदिरात पत्ते उघडले तर आमच्या नशिबाचा पत्ता कधी उघडणार?" मंत्रालयातील खुर्च्या आता “रमीची रॉयल रुम” झाल्या आहेत. पुढे काय माहीत, कदाचित विधानसभा सत्राची सुरुवातही “शफल द डेक, प्ले द गेम” या मंत्रोच्चारानेच होईल.

### "पत्त्यांच्या डावात जनता नेहमीच हरलेली!"

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि सरकारी कार्यालयांत आज एक नवा खेळ प्रचलित आहे – “काम न करता कार्ड्स खेळा, जनता कुठे जाणार?” पण लक्षात ठेवा,"जेव्हा जनता एक दिवस पत्ते उघडेल, तेव्हा या खेळाडूंची बाजी कायमची फसलेली असेल!"

# युवा खेळाडूंची जबरदस्त कामगिरी



इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतच्या युवा संघाने ५ कसोटी सामन्यांची मालिका २ - २ अशी बरोबरीत सोडवून इतिहास रचला. सोमवारी पाचव्या कसोटीच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारतीय संघ इंग्लंडचे उरलेले चार फलंदाज बाद करून ही कसोटी जिंकेल असा विचारही कोणी केला नसेल कारण इंग्लंडला जिंकायला फक्त ३६ धावा हव्या होत्या. इंग्लंडचे उरलेले फलंदाज या धावा सहज करतील आणि मालिका ३ - १ ने जिंकतील असाच सर्वांचा होरा होता. मात्र भारतीय खेळाडूंच्या मनात काहीही करून ही कसोटी जिंकायचीच आणि मालिका बरोबरीत सोडवायची असा विश्वास होता आणि या विश्वासाच्या जोरावरच भारताने ही कसोटी अवघ्या सहा धावांनी जिंकली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. भारताचा हा विजय म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल अर्थात चमत्कार करण्याची देखील कला असावी लागते ही कला भारतीय खेळाडूंनी साध्य केली आणि साहेबांना त्यांच्या देशातच लोळविले. ही मालिका बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे भारताचा हा विजयच आहे कारण भारतीय संघ जेव्हा ही मालिका खेळण्यासाठी इंग्लंडच्या भूमीवर उतरला तेव्हा त्यांच्या स्वागताला कोणी हजर नव्हते. सराव सत्रालाही गर्दी नव्हती कारण सर्वांच्या मते इंग्लडच्या बलाढ्य आणि अनुभवी संघापुढे भारताचा युवा आणि अननुभवी संघ टिकणार नाही.

इंग्लडच्या अनेक दिग्गज माजी खेळाडू इंग्लड ही मालिका ४ - १ किंवा ५ - ० अशी जिंकेल असे छातीठोकपणे सांगत होते अर्थात त्याला कारणही तसेच होते रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन या भारताच्या माजी खेळाडूंनी निवृत्ती घेतली होती तर पुजारा, रहाणे, मोहम्मद शमी यासारख्या अनुभवी खेळाडूंना या मालिकेत वगळण्यात आले होते. बुमरा, के एल राहुल, जडेजा आणि पंत वगळता सर्वच खेळाडू नवखे होते. या मालिकेसाठी शुभमन गिल या युवा खेळाडूची निवड करण्यात आली होती. बुमरा आणि पंत हे जरी अनुभवी असले तरी ते पूर्ण पाच कसोटी खेळणार नव्हते त्यामुळे ही मालिका इंग्लंड सहज जिंकेल असा कयास लावला जात होता मात्र भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून हा कयास फोल ठरवला. मालिकेच्या पहिल्या कसोटीतच भारताच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत इंग्लंडला इशारा दिला. वास्तविक पहिलीच कसोटी भारताने जिंकली असती पण मोक्याच्या क्षणी झेल सोडल्याने ही कसोटी इंग्लंडला जिंकता आली. दुसऱ्या कसोटीत मात्र भारताने पलटवार करत इंग्लडला तब्बल ३३६ धावांनी नामोहरण केले. तिसरी कसोटीही भारतानेच जिंकली असती मात्र नशीब बलवत्तर होते म्हणून इंग्लडला ही कसोटी अवघ्या २२ धावांनी जिंकता आली. चौथ्या कसोटीत मात्र दोन्ही संघाने तोडीस तोड कामगिरी केल्याने ती कसोटी अनिर्णित राहिली. पाचव्या कसोटीत पुन्हा भारताने जबरदस्त कामगिरी करत विजय मिळवला आणि मालिका बरोबरीत सोडवली. ज्या संघाचा मानहानीकारक पराभव होईल असा अंदाज होता त्याच संघाने मालिका बरोबरीत सोडवत इतिहास घडवला.

भारतीय संघाच्या या ऐतिहासिक यशाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. भारताच्या युवा खेळाडूंकडे अनुभवाची कमतरता असली जिंकण्याचा विश्वास होता याच विश्वासाच्या बळावर भारताच्या या युवा संघाने ही कामगिरी केली. भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर नेत्रदिपक कामगिरी केली. कर्णधार शुभमन गिल, के एल राहुल, यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत या खेळाडूंनी संपूर्ण मालिकेत धडाकेबाज फलंदाजी करून इंग्लंडची गोलंदाजी नेस्तनाबूत केली. कर्णधार शुभमन गिलने संपूर्ण मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून विक्रमी कामगिरी केली. तर के एल राहुलने ५३२ धावा काढल्या. ऋषभ पंत आणि यशस्वी जयस्वाल यांनी ४०० पेक्षा अधिक धावा काढल्या. भारताच्या या युवा फलंदाजांची ही कामगिरी हेवा वाटावी अशीच आहे. या खेळाडूंनी खोऱ्याने धावा काढल्याने मालिका बरोबरीत सोडवण्यास मोठी मदत झाली. गोलंदाजीतही भारतीय गोलंदाजांनी कमाल केली. बुमरा, सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप या वेगवान गोलंदाजांनी कमाल करत इंग्लडच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. मोहम्मद सिराजने मालिकेत सर्वाधिक २३ बळी घेतले. बुमरा आणि प्रसिद्ध कृष्णा या तिघांनी ३ कसोटी खेळले आणि त्यांनी प्रत्येकी १४ बळी घेतले. तर आकाशदीपनेही ३ कसोटीत १३ बळी घेतले शिवाय शेवटच्या कसोटीत नाईट वाचमन म्हणून मोक्याच्या क्षणी अर्धशतक झळकावले. मोहम्मद सिराजने तर या मालिकेत अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजाने या मालिकेत अष्टपैलू खेळ केला. रवींद्र जडेजाने या मालिकेत ५०० पेक्षा जास्त धावा काढल्या आणि मोक्याच्या क्षणी ७ बळी घेतले. एकूणच भारताच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली.

भारताचा नवा कर्णधार शुभमन गिलने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. कर्णधार म्हणून पहिलीच मालिका खेळत असतानाही तो कुठेही गांगरलेला वाटला नाही उलट मोक्याच्या क्षणी डोके शांत ठेवून व्यूहरचना रचत त्याने आपल्यातील नेतृत्वगुण दाखवून दिले. कर्णधारपदावर झालेली आपली निवड सार्थ ठरवत त्याने ही मालिका बरोबरीत सोडवली. कर्णधार असूनही त्याने आपल्या फलंदाजीवर परिणाम होऊ दिला नाही उलट कर्णधार झाल्यावर त्याची बॅट आणखी तळपली. त्याने या मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून कर्णधार म्हणून एका मालिकेत सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम केला. त्याने या मालिकेत ४ शतके झळकावली. तोच या मालिकेचा मालिकावीर ठरला एकूणच भारताच्या या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून ही मालिका बरोबरीत सोडवली. भारताच्या या नव्या युवा संघाची ही कामगिरी कौतुकास्पदच नाही तर अभिमानास्पद आहे. इंग्लड विरुद्धची कसोटी मालिका बरोबरीत सोडवणाऱ्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## पत्र मानस

### भारतीय क्रिकेट संघाचे मन:पूर्वक अभिनंदन!

ओव्हल, लंडन येथील पाचव्या व शेवटच्या कसोटी सामन्यात इंग्लंडला विजयासाठी अवघ्या ३५ धावा करायच्या होत्या तर भारताला विजयासाठी इंग्लंडचे चार गडी बाद करायचे होते. एकूणच हा सामना पूर्णपणे इंग्लंडच्या बाजूने झुकला होता. मात्र कोण जिंकणार? या प्रश्नाने प्रत्येक चेंडूगणिक प्रेक्षकांच्या हृदयाची धडधड वाढत होती. परंतु शेवटच्या क्षणी प्रसिध कृष्णा आणि मोहम्मद सिराज या भारतीय गोलंदाजांनी कमाल केली आणि पराभवाच्या कराल दाढेतून विजयश्री खेचून आणली. भारतीय क्रिकेटप्रेमींनी सुटकेचा निश्वास टाकला आणि मग अवघा आनंदी आनंद झाला. पाच सामन्यांची तेंडुलकर-अँडरसन कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. खरे तर भारत आणि इंग्लंड यांच्यातली ही मालिका पहिल्या सामन्यापासूनच अगदी रोमहर्षक आणि चित्तथरारक ठरली. पाचपैकी दोन्ही संघांनी प्रत्येकी दोन सामन्यांत विजय मिळवला. तर एक सामना अनिर्णित राहिला. भारताचे सर्वच खेळाडू यावेळी फॉर्मात होते आणि वेळोवेळी प्रसंगानुसार त्यांनी संघासाठी आपले १०० टक्के योगदान दिले. पण सर्वात जास्त कौतुकास पात्र ठरला आहे तो भारताचा नवा व युवा कसोटी कर्णधार शुभमन गिल! शुभमन गिलने मालिकेत चार शतकांसह ७५४ धावा केल्या आणि संघाला शाश्वत नेतृत्व दिले. एकूणच या मालिकेत भारतीय खेळाडूंची कठोर मेहनत, संघभावना आणि जिगरबाज खेळ पाहायला मिळाला. भारतीय क्रिकेट संघाचे मन:पूर्वक अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

### ट्रम्प यांची मनमानी रोखावी

भारतावर तब्बल २५ टक्के आयात शुल्क लादण्याची घोषणा केल्यापासून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारताला लक्ष्य करत आहेत.आता ट्रम्प सातत्याने भारताला रशियाकडून तेल खरेदी अतिरिक्त टॅरिफ लागू करण्याची धमकी देत आहेत.अमेरिकेत शिकण्यासाठी वा नोकरी करण्यासाठी जाणाऱ्या भारतीयांना व्हिसा देणे बंद करण्याची चर्चा सुरु झाली आहे.अमेरिकेत तयार होणाऱ्या उत्पादनांना सहजपणे भारतीय बाजारपेठेत प्रवेश मिळावा यासाठी ट्रम्प सातत्याने भारतावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत व अमेरिकतील द्विपक्षीय संबंध का ताणले जात आहे?सारखे आयात शुल्क वाढवणे,हे कोणत्या आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आहे. भारत व पाकिस्तान यांच्यातील संघर्षात अमेरिकेने मध्यस्थी केल्याचे श्रेय न दिल्याने हा भडका उडाला आहे का? अमेरिकेने भारताला सातत्याने लक्ष करणे भारतावर अन्याय करणारे ठरत आहे. दोस्तीचे रुपांतर शत्रुत्वात का झाले? अमेरिका पाकिस्तानला मदत करीत हाताशी घरुन भारताविरोधात कटकारस्थान रचते ते कसे चालते? अमेरिका व भारत या दोन महत्वाच्या भागीदार देशांमध्ये निर्माण होणारे वाद आणि ताण व तणाव भविष्यातील धोरणात्मक निर्णयांवर प्रभाव टाकण्याची शक्यता असल्याने ट्रम्प यांची मनमानी रोखली पाहिजे.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### संसदीय कामकाज सुरळीत चालणे जरुरीचे

संसदेची दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरु होऊन आठ दहा दिवस झाले या मुदतीत दोन्ही सभागृहाचे कामकाज अनेक वेळा बंद पडल्याचे दिसून आले आहे सभागृहात आपल्या वक्तृतवाने अनेक सभासदांनी सरकारी मुद्दे खोडून काढल्याचे पूर्वी आपण अनेक वेळा पहिले आहे . सभागृहाच्या एका मिनिटाची किंमत लाखो रुपये आहे . आपण निवडून दिलेले सभासद विचारी आहेत सर्वांनी मिळून हे कामकाज व्यवस्थित चालवावे ब्रिटनच्या संसदेत असे कधीही घडून येत नाही गेली कित्येक वर्षे संसदेचे कामकाज सुरळीत होत नाही जगातील सर्वात मोठया लोकसंख्या असलेल्या देशात संसदीय कामकाज व्यवस्थित चालणे हि काळाची गरज आहे

**- शांताराम वाघ पुणे**

## उल्हासनगर वाहतूक पोलिसांची नवी हेल्पलाइन सेवा सुरू

**उल्हासनगर:** रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येसह पार्किंग, बेशिस्त रिक्षाचालक, रस्त्यात पडून असलेल्या गाड्या अशा कोणत्याही प्रकरच्या वाहतूकीच्या अडचणींवर मात करण्यासाठी आता उल्हासनगर वाहतूक विभागाने वाहतूक हेल्पलाईन सेवा सुरू केली आहे. यापुढे 91 8655654186 या क्रमांकावर संपर्क केल्यास वाहतूक पोलीस आपल्या वाहतूक समस्यांचे निरसण करतील. नागरिकांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेश शिरसाट यांनी केले आहे. व्यापारी शहर असलेल्या उल्हासनगर शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या वाहतूक कोंडी वाढते आहे. मालाची ने आण करणारे आणि रस्त्यातच थांबणारे मालाचे ट्रक, टेम्पो, बेकायदेशीर पार्किंग, रस्त्यांवरील रिक्षाचालकांची मनमानी आणि ट्रॅफिक सिग्नलचे उल्लंघनामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.




म ह त्वा चे

### प्रवाशाच्या अंगावर रिक्षा घालण्याचा प्रयत्न

**कल्याण :** कल्याण पश्चिम रेल्वे स्थानका जवळील रिक्षा चालकांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत असल्याने प्रवासी हैराण आहेत. सोमवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या दरम्यान एका मुजोर रिक्षा चालकाने एका नोकरदाराच्या अंगावर रिक्षा घालून त्याला जखमी करण्याचा प्रयत्न केला. प्रवाशाने यासंदर्भात रिक्षा चालकाला जाब विचारताच, संबंधित रिक्षा चालकासह इतर रिक्षा चालकांनी प्रवाशाला फैलावर घेऊन दमदाटी केली.
असे अनुभव दररोज प्रवासी कल्याण रेल्वे स्थानक भागात घेतात. या घडल्या प्रकाराबाबत प्रवाशाने कल्याणचे उपप्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुळ यांच्याकडे तक्रार केली आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाने संबंधित रिक्षा चालकावर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. मिळालेली माहिती अशी की, ज्या प्रवाशाच्या अंगावर रिक्षा चालकाने रिक्षा घालून त्यांना जखमी करण्याचा प्रयत्न केला. ते प्रवासी भिवंडी येथे राहतात. सोमवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या दरम्यान हा प्रवासी नेहमीप्रमाणे कल्याण रेल्वे स्थानकात उतरून रेल्वे स्थानका बाहेर भिवंडी येथे जाण्यासाठी आले.

### कबुतराला दाणे टाकण्यास मनाई केल्याने मारहाण

**मिरारोड :** मिरारोडच्या काशिमिरा परिसरात कबुतराला दाणे टाकण्यास मनाई केल्याने एका वृद्धास मारहाण व मुलीचा गळा दाबून लोखंडी रॉडने मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.या प्रकरणी चार जणांविरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तक्रारीनुसार, काशिमिरा पोलीस ठाण्यापासून अंतरावर असलेल्या डिबी झोन इमारती ३० मध्ये राहणारे महेंद्र पटेल (वय वर्ष ६९) रविवारी सकाळी दूध आणण्याकरता इमारतीखाली गेले. यावेळी समोरच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या आशा व्यास (वय वर्ष ५६) इमारतीच्या परिसरात कबुतरांना दाणे टाकत होत्या.दरम्यान वयोवृद्ध व्यक्ती महेंद्र पटेल यांनी आपण सार्वजनिक ठिकाणी कबुतराला दाणे टाकू नका असे सांगितले. या गोष्टीचा राग मनात धरून व्यास यांनी या वृद्धास शिवीगाळ केली. हा सर्व गोंधळ पटेल यांच्या मुलीला कळाल्यानंतर ती देखील घटनास्थळी पोहोचली.

### अंत्यविधीसाठी जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था

**उरण :** चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता एका खासगी कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता उखडून टाकला आहे. त्यामुळे गावकऱ्यांना मृतदेह अंत्यविधीसाठी नेताना भरपावसात चिखल-मातीच्या मार्गातून संघर्ष करत नेण्याची वेळ आली आहे. या गंभीर प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. सध्या या खासगी कंपनीकडून रेवस-करंजा सागरी उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. हे काम चाणजे, करंजापाडा, नागपाडा, बोबडीपाडा परिसरात मोठ्या प्रमाणावर होत असून त्याचा प्रत्यक्ष फटका स्थानिक ग्रामस्थांना बसत आहे. विशेषतः समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या स्मशानभूमीकडे जाणारा पारंपरिक रस्ता कंपनीने कोणतीही पूर्वकल्पना न देता उखडून टाकला.

# आमची संख्या 90 टक्के आणि प्रतिनिधित्व 9 टक्के कसे?

## ओबीसी आरक्षणावरून आव्हाडांचा सवाल

प्रतिनिधी
■ ठाणे



महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक शक्तीपीठ म्हणून श्री तुळजाभवानी देवीचे मंदीर ओळखले जाते. ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिद्ध असून ती महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखली जाते. या मंदिरात पाणी गळती होत आहे. त्यामुळे मंदीराचा गाभारा पाडण्यात येत आहे. त्यास विरोध होत असून त्यावर आता राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मंगळवारी ठाण्यात पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी आव्हाड म्हणाले, जातीव्यवस्थेला छेद देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांनी एक मोठा समुदाय असलेल्या ओबीसी समाजाला आरक्षण दिले. इतर मागासवर्गीयांना जो अधिकार मिळतो, त्याचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. मंडल आयोगाला विरोध पहिल्यांदा भाजपने केला. पुरोगामी महाराष्ट्राचे नेते आणि तेव्हाचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी निर्णय घेताना सर्वांशी चर्चा केली आणि हा निर्णय घेतला. मंडल आयोग कोणी स्वीकारला असेल तो महाराष्ट्र राज्याने. काल सुप्रीम कोर्टाने मार्ग खुले केले आणि जातीय आरक्षणातून निवडणूक झाली पाहिजे, हे सांगितले, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

बहुजनांचे राज्य आले पाहिजे हे आमचे म्हणणे आहे. आमची संख्या ९० टक्के आणि आमचे प्रतिनिधित्व ९ टक्के कसे चालेल. जिसकी जितनी संख्या, उसकी उतनी जिम्मेदारी. इतर मागासवर्गीय हे ६५ टक्के आहेत. बहुजनांची संख्या बिहारमध्ये ८५ टक्के आहे. शरद पवार यांनी मंडल आयोग लागू केले. ९ ऑगस्ट पासून नागपूर येथून मंडल यात्रा सुरू होईल, राज राजापूरकर यांच्या नेतृत्वात ही यात्रा असेल. याला हिरवा झेंडा स्वतः शरद पवार दाखविणार आहेत.

ओबीसी यांच्या आरक्षणाला विरोध केला, ते आता म्हणत आहेत, आमचा डिएनए ओबीसी आहे. गोस्वामी नावाच्या व्यक्तीने आग लावून घेतली होती, मंडल आयोगाच्या विरोधात हा कोण होता गोस्वामी? मंडल आयोगाचे जनक विश्वनाथ प्रताप सिंग हे होते. जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे म्हणून आम्ही विधिमंडळात भाषण केली. लोकांमध्ये मंडल आयोगाबाबत जागृती व्हावी, आपल्या हक्क बद्दल जागृती व्हावी, आपल्यावर झालेला अन्याय विसरता कामा नये यासाठी ही जनजागरण यात्रा सुरू होणार आहे. वन नेशन वन इलेक्शन हे चुकीचे आहे. या सरकारमुळे तीन वर्ष वाया गेली.

# केडीएमसी पालिकेच्या शाळांमधील अडीच हजार विद्यार्थी गणवेश, रेनकोटच्या प्रतीक्षेत

प्रतिनिधी
■ कल्याण



कल्याण डोंबिवली पालिकेच्या शाळांमधील सुमारे अडीच हजार विद्यार्थी अद्याप गणवेश, रेनकोट आणि इतर शालेय साहित्याच्या प्रतीक्षेत आहेत. आपल्या मुलांना शालेय साहित्य कधी मिळेल या प्रतीक्षेत पालक आहेत. विद्यार्थीही शाळा सुरू झाल्यापासून गणवेश, रेनकोट आणि इतर शालेय साहित्य न मिळाल्याने हिरमुसले आहेत.

कल्याण डोंबिवली पालिका शिक्षण मंडळाच्या अखत्यारित ६१ शाळा आहेत. या शाळांमध्ये एकूण सुमारे साडे आठ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. आतापर्यंत पालिकेच्या शिक्षण विभागाने सहा हजार विद्यार्थ्यांना गणवेश, रेनकोट आणि इतर शालेय साहित्याचे वाटप केले आहे. शालेय साहित्यापासून वंचित असलेली काही मुले ही झोपडपट्टी, शहराच्या परीघ क्षेत्रावरील शाळांमधील आहेत.

काही विद्यार्थी नवीन गणवेश नसल्याने मागील वर्षीचा गणवेश घालून शाळेत येत आहेत. काही पालक आमच्या मुलांना पालिकेकडून गणवेश, रेनकोट, चपला साहित्य कधी मिळणार म्हणून शिक्षकांकडे विचारणा करण्यासाठी येतात. या पालकांना उत्तरे देताना शिक्षकांची दमछाक होत आहे. पाऊस संपत आला तरी रेनकोट मिळाला नसल्याने पालक नाराजी व्यक्त करत आहेत.

विद्यार्थ्यांच्या मापाप्रमाणे त्यांना गणवेश मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांची मापे घेऊन त्यांना गणवेश शिवून देण्याचे काम पालिकेने ठेकेदाराला दिले आहे. एकावेळी साडे आठ हजार विद्यार्थ्यांचे गणवेश शिवून मिळण्यात विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात विलंब होत आहे. तरीही लवकरात लवकर हे गणवेश देण्याचे नियोजन आहे, अशी माहिती पालिका शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी दिली.

# टिटवाळ्यातील शाळा परिसरातील पान टपऱ्यांवर पोलिसांची कारवाई



प्रतिनिधी
■ टिटवाळा

टिटवाळ्यातील बेकायदा बांधकामे, फेरीवाले यांच्यावर कारवाईचा बडगा सुरू असतानाच, कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागाने टिटवाळा पोलिसांच्या साहाय्याने शहरात नशामुक्त अभियान मोहीम मंगळवारपासून सुरू केली या मोहिमेंतर्गत शाळांच्या परिसरात पान टपऱ्या चालवून त्या माध्यमातून प्रतिबंधित गुटखा सदृश्य सुगंधित वस्तू विक्री करणाऱ्या पान टपरी चालकांच्या टपऱ्या पालिका आणि पोलिसांनी बंद केल्या.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील अनेक पान टपरी चालक नियमितच्या पान विक्री बरोबर प्रतिबंधित गुटखा सदृश्य वस्तू विक्री करत असल्याचे पोलिसांनी वेळोवेळी शहराच्या विविध भागात घातलेल्या छाप्यांवरून उघड केले आहे. बहुतांशी तरूण पीढी अलीकडे प्रतिबंधित गृटखा, गांजा सेवनाकडे वळत आहे.

# नवी मुंबईत अंधश्रद्धेच्या नावाखाली होतेय लोकांची फसवणूक

## अंनिस चे 24 ऑगस्ट रोजी मार्गदर्शन शिबिर

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई सारख्या आधुनिक शहरात गेल्या काही दिवसात अंधश्रद्धाच्या माध्यमातून दहशत व भीती निर्माण करून फसवणूक करण्याच्या घटना वाढत असल्याचे दिसून आले आहे. नुकतेच बेलापूर येथे एका मांत्रिकाने वकिलाला पैसे दुप्पट करून देतो म्हणून सांगून लाखो रुपयांची फसवणूक केली. तसेच बेलापूर कोर्टातही लिंबू मिरची ठेवून अंधश्रद्धाळू भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या सर्व फसवणुक करणाऱ्या व दहशत निर्माण करणाऱ्या प्रकारांचा तीव्र निषेध केला आहे.

लिंबू मिरची टाकून दहशत निर्माण करणे हा जादूटोणा विरोधी कायद्याखाली गुन्हा असून न घाबरता अशा प्रकारांची तक्रार नागरिकांनी पोलिसांकडे करावी व या प्रकारांना बळी पडू नये असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने केले आहे.

अंनिसचे 24 ऑगस्टरोजी शिबिर

या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बेलापूर नेरूळ शाखेतर्फे रविवार 24 ऑगस्ट रोजी आग्रोळी येथील कॉम्रेड बी. टी. रणदिवे ग्रंथालयात एक दिवसाचे अंधश्रद्धा निर्मूलन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात करणी, भूत, भानामती, बुवाबाजी, चमत्कार, या विषयासंदर्भात वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडणी केली जाईल व जादूटोणा विरोधी कायद्याची माहिती दिली जाईल. नागरिकांनी या शिबिरासाठी आपले नाव 15 ऑगस्टपूर्वी नोंदवावे. असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्कासाठी-- राजीव देशपांडे-9136109845 रमेश साळुंखे- 9224340720, विजय खरात - 9757249486.

# कल्याण जिल्हा होणारच

## मुख्यमंत्र्यांचा शब्द - आमदार कथोरे



प्रतिनिधी
■ उल्हासनगर

ठाणे जिल्ह्यातील कल्याण हा स्वतंत्र जिल्हा व्हावा ही आमची सुरूवातीपासूनची मागणी आहे. आता लवकरच जनगणना होणार आहे. त्यानंतर नक्कीच कल्याण हा जिल्हा होईल. तसा शब्द मला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे, अशी प्रतिक्रिया मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी दिली आहे. ते कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीतील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाच्या शुभारंभाप्रसंगी आले होते. कल्याण जिल्हा होत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही, असेही कथोरे यावेळी म्हणाले.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात रस्तयांची दुरावस्थआ झाली होती. येथे शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांची मोठी वर्दळ असते. मात्र चांगल्या रस्त्यांअभावी सर्वांनाच त्रासाला सामोरे जावे लागत होते.

# 46 व्या वाढदिवशी 46 बेरोजगारांना नोकऱ्या...

प्रतिनिधी
■ नवी मुंबई



सानपाडा येथील माजी नगरसेवक सोमनाथ चिंतामण वासकर यांच्या ४६ व्या वाढदिवसानिमित्त ४६ बेरोजगारांना नोकऱ्या देऊन महत्वपूर्ण विधायक पाऊल उचलण्यात आले. महारोजगार मेळावा, रक्तदान शिबिर, चित्रकला स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, सफाई कर्मचाऱ्यांना भेटवस्तू वाटप इत्यादी भरगच्च विविध सामाजिक उपक्रमांनी हा वाढदिवस विशेष ठरला.

माजी नगरसेवक सोमनाथ वासकर यांचा सानपाड्यातील विविध संस्थांच्यावतीने नुकताच ४६ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त झालेल्या रोजगार मेळाव्यात ४६ जणांना विविध कंपन्यामार्फत नोकरीसाठी नियुक्ती पत्रे देण्यात आली. रक्तदान शिबिरात ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर चित्रकला स्पर्धेत ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सोमनाथ वासकर हे गायत्री मंदिर, शिव मंदिर ट्रस्ट, वात्सल्य ट्रस्ट, श्री दत्त मंदिर विद्यालय, बल्लाळेश्वर सहकारी पतसंस्था अशा अनेक सामाजिक संस्थांशी संबंधित आहेत. याप्रसंगी समाजसेवक भाऊ भापकर, शिवसेनेचे नवी मुंबई उपजिल्हाप्रमुख अजित सावंत, शिवसेना उबाठाचे विभागप्रमुख अजय पवार, मारुती विश्वासराव, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती कदम, खजिनदार विष्णुदास मुखेकर, उपाध्यक्ष बळवंतराव पाटील, सेवानिवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ, सानपाडा हास्य क्लबचे योगशिक्षक भरत खरात, गार्डन ग्रुपचे अध्यक्ष सदाशिव तावडे, खजिनदार रणवीर पाटील, सामाजिक कार्यकर्ते गणपत वापरे इत्यादी मान्यवरांनी वासकर यांच्या सामाजिक कार्याचा गुणगौरव करून त्यांना पुढील सामाजिक व राजकीय प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

# यंदा पारसिक खाडीत ठराविक उंचीच्या मुर्तींचे होणार विसर्जन

■ ठाणे

ठाणे महापालिका क्षेत्रासह मुंबईतील विक्रोळीपर्यंतच्या मोठ्या गणेश मुर्तींचे विसर्जन कळवा येथील पारसिक रेतीबंदर खाडीत करण्यात येते. या घाटावर येणाऱ्या गणेश मुर्तींची संख्याही मोठी असते आणि पहाटेपर्यंत या गणेश मुर्तींचे विसर्जन होत असते. परंतु यंदा याठिकाणी ठराविक उंचीपर्यंतच्या गणेश मुर्तींचे विसर्जन होऊ शकणार असून त्याचे कारण ठाणे पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी मंगळवारी ठाणे महापालिका मुख्यालयात पार पडलेल्या गणेशोत्सव मंडळांच्या बैठकीत सांगितले.

ठाणे महापालिका क्षेत्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून विविध देखावे उभारून



सामाजिक संदेश देण्यात येतो. या मंडळांच्या गणेश मुर्ती मोठ्या असतात. त्यांची उंची १० फुटांच्या पुढेच असते. ठाणे शहरात गणेश मुर्ती विसर्जनामुळे तलावांचे पाणी प्रदुषित होऊ नये यासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात येतात. परंतु याठिकाणी सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यात येते. तर, सहा फुटांपेक्षा जास्त उंचीच्या गणेश मुर्तींचे विसर्जन कोलशेत, पारसिक रेतीबंदरच्या खाडीत करण्यात येते.

यातही पारसिक येथे मोठ्या उंचीच्या मुर्ती विसर्जनासाठी येण्याचे प्रमाण सर्वाधिक असते. मुंबई-नाशिक महामार्गाला लागूनच पारसिक रेती बंदरचा विसर्जन घाट असून यामुळे या मार्गे घाटावर जाणे गणेश भक्तांना सोयीचे वाटते. त्यामुळे या घाटावर गणेश मुर्ती विसर्जनासाठी येण्याचा प्रमाण सर्वाधिक असते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

प्रतिनिधी
■ पनवेल




समाजहिताची भूमिका समर्थपणे निभावणारे आणि कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांनी वडील लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आई शकुंतला ठाकूर यांचे आशिर्वाद घेतले. त्यानंतर पनवेलमधील मार्केट यार्ड येथे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी गर्दी केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील अनेक मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# समृध्दी महामार्गाच्या भिवंडी वडपे ते कसारा दरम्यान सीसीटीव्ही कॅमेरे

## सुसाट वाहन चालकांना लगाम लावण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी
■ भिवंडी

समृध्दी महामार्गाच्या भिवंडी जवळील वडपे गाव ते कसारा दरम्यानच्या सुमारे सव्वाशे किलो मीटर अंतरावरील रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सुरू केले आहे. एक किलो मीटर अंतराने हे कॅमेरे लावले जात आहेत. एक सीसीटीव्ही कॅमेरा ५०० मीटरच्या परिसरावर नजर



ठेवेल, अशा पध्दतीने हे सीसीटीव्ही कॅमेरे महामार्गावर लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. वेगाची मर्यादा ओलांडून वाहने चालविणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांना या माध्यमातून लगाम घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे ‘एमएसआरडीसी’च्या अधिकाऱ्याने सांगितले.

प्रखर भेदन क्षमता असलेल्या या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहनावरील क्रमांक अचूकपणे टिपण्याची क्षमता आहे. या सीसीटीव्ही नियंत्रणासाठी ठाण्यात स्वतंत्र नियंत्रण कक्ष तयार करण्यात आला आहे. समृध्दी महामार्गावर धावणाऱ्या प्रत्येक वाहनावर या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे. नियंत्रण कक्षातून सीसीटीव्हीचे चित्रिकरण दररोज तपासले जाणार आहे.

# ‘हर घर तिरंगा‘ या उपक्रमातंर्गत पालिकेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन!

प्रतिनिधी
■ कल्याण




शासनाच्या निर्देशानुसार "हर घर तिरंगा" अर्थातच "घरोघरी तिरंगा" हा उपक्रम यावर्षी 2 ऑगस्ट 2025 ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. नागरिकांचे राष्ट्रध्वजाशी वैयक्तिक नाते दृढ व्हावे तसेच युवा पिढीमध्ये जाज्वल्य देश प्रेम निर्माण व्हावे या हेतूतून या अभियानातंर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये दि.02 ऑगस्ट 2025 रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शालेय विदयार्थ्यांना आपला तिरंगा ध्वज कसा तयार झाला याची माहिती देण्यासाठी काल महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये तिरंगा चित्राचे मनोहारी प्रदर्शन साकारण्यात आले होते.

याच उपक्रमांतर्गत महापालिकेच्या विद्युत विभागाने देखील शहरातील प्रमुख ठिकाणी म्हणजेच चौक,महत्त्वाच्या इमारती, महापालिका इमारत , छत्रपती शिवाजी महाराज चौकातील ओक टॉवर अशा ठिकाणी आकर्षक तिरंगा रोषणाई केल्यामुळे रात्रीच्या वेळी या इमारती नयनरम्य रंगाने नाहुन गेलेल्या दृष्टीपथास येत आहे.

त्याचप्रमाणे "हर घर तिरंगा" उपक्रमातंर्गत महापालिकेच्या विदयुत विभागामार्फत रविवार दि.10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 6.30 वाजता महापालिका मुख्यालयापासून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी महापालिकेच्या या सायकल रॅलीमधे तसेच "हर घर तिरंगा" या उपक्रमातंर्गत दि.15 ऑगस्ट 2025 पर्यंत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणा-या विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्तांनी गणेश मंडळ प्रमुखांसोबत साधला संवाद

प्रतिनिधी
■ ठाणे



ठाणे महापालिका क्षेत्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून विविध देखावे उभारून सामाजिक संदेश देण्यात येतो. ठाणे शहरात गणेश मुर्ती विसर्जनामुळे तलावांचे पाणी प्रदुषित होऊ नये यासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात येतात. या सर्वच व्यवस्थेची माहिती देण्यासाठी आयुक्त सौरभ राव यांनी मंगळवारी गणेश मंडळाची बैठक घेतली. यात त्यांनी गणेश मंडळ आणि भक्तांसाठी महत्वाची माहिती दिली.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या बैठकीत गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, विक्रेते, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलिस उपायुक्त प्रशांत कदम, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, महापालिका उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, मधुकर बोडके, दिनेश तायडे, सचिन सांगळे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांच्यासह महापालिका, महावितरण, टोरेंट पॉवर, स्वंयसेवी संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यासाठी उच्च न्यायालयाचे आदेश, त्याअनुषंगाने राज्य शासनाने जाहीर केलेली कार्यपद्धती याची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली. तसेच, ठाणे महापालिकेने संपूर्ण विसर्जन व्यवस्थेची माहिती देणारे हरित विसर्जन ॲप तयार केले आहे.

## सुधीर रसाळ यांना मुक्तसृजन संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार

**संभाजीनगर :** मराठीतील ऋषितुल्य साक्षेपी समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना मुक्तसृजन संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. महेश खरात यांनी दिली. रोख 11000 रुपये, मानचिन्ह, मानपत्र, शाल व पुष्पहार असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हा सोहळा 11 ऑगस्ट 2025 रोजी सायंकाळी 5.30 वाजता गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी नाट्यगृह सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. सुधीर रसाळ हे मराठीतील नामवंत, व्यासंगी समीक्षक, अभ्यासक, संशोधक म्हणून सर्वश्रुत आहेत. त्यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या ग्रंथास साहित्य अकादमीचा मानाचा पुरस्कार नुकताच प्राप्त झाला आहे. सुधीर रसाळ यांचा सन्मान सोहळा 11 ऑगस्ट 2025 रोजी सायंकाळी 5.30 वाजता गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी नाट्यगृह सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होईल. नवी दिल्ली येथील नॅशनल बुक ट्रस्ट इंडियाचे चेअरमन प्रो. मिलिंद मराठे यांच्या शुभहस्ते देऊन हा पुरस्कार प्रदान केला जाईल.



## म ह त्त्वा चे

### 'भिडे वाडा'च्या बांधकामासाठी वाहतूक बदल

**पुणे :** छत्रपती शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा स्मारकाच्या बांधकामासाठी हुतात्मा चौकातून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. दररोज रात्री दहा ते सकाळी सहापर्यंत या भागातून जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक बदल २५ ऑगस्टपर्यंत लागू राहणार आहेत. छत्रपती शिवाजी रस्त्यावर भिडे वाडा स्मारक आहे. या स्मारकाचे काम सुरू करण्यात आले आहे. बांधकाम साहित्य वाहतूक करणारी वाहने, अवजड क्रेन कामानिमित्त ये-जा करणार आहेत. हे काम दररोज रात्री दहानंतर करण्यात येणार आहे. त्यामुळे गाडगीळ पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी रस्त्यावरुन स्वारगेटकडे जाणारी वाहतूक वळवण्यात येणार आहे. २५ ऑगस्टपर्यंत रात्री दहा ते सकाळी सहापर्यंत या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहे. वाहतूक बदलाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

### येस बँकमध्ये मनसेचा राडा, अधिकाऱ्याला चोप

**नागपूर :** नागपूरच्या येस बँकेवर फसवणुकीचा आरोप करत मनसे आज आक्रमक बनली आहे. मनसे कार्यकर्त्यांकडून एका अधिकाऱ्याला चोप देण्यात आलाय. एका शेतकऱ्याची फसवणूक केल्याचा येस बँकेच्या नागपूर शाखेवर आरोप करण्यात आलाय. शेतकऱ्याची जेसीबी ताब्यात घेऊन तातडीने लिलाव करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्याची मोठी फसवणूक झाल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला. मनसे कार्यकर्ते या बँकेत घुसले. त्यांनी अधिकाऱ्याला जाब विचारला. त्यानंतर या अधिकाऱ्याला मारहाण करण्यात आली. नागपूरमधील येस बँकेवर फसवणुकीचा आरोप करत या बँक अधिकाऱ्याला मारहाण करण्यात आली. वेळीच पोलीस दाखल झाल्याने पुढील अनर्थ टळला. त्यांनी या अधिकाऱ्याचा बचाव केला.

### चाळीत ठेवलेला 700 क्विंटल कांदा जाळला

**नाशिक :** कांद्याला अपेक्षित दर नसल्याने अनेक कांदा उत्पादक शेतकऱ्यानी कांद्याची साठवणूक करून ठेवली आहे. शेतातच चाळ करून कांदा ठेवण्यात आला आहे. दरम्यान निफाड येथे चाळीत ठेवलेला सुमारे ७०० क्विंटल कांदा अज्ञात व्यक्तीने जाळून टाकल्याचे समोर आले आहे. यात आजच्या बाजारभावाप्रमाणे शेतकऱ्याचे सात लाख रुपयांहून अधिकचे नुकसान झाले आहे. नाशिकच्या निफाड येथील कांदा उत्पादक शेतकरी गोपाळराव संपत गाजरे यांच्या चाळीतील कांदा जाळण्यात आला आहे. गाजरे यांनी पाच लाख रुपये खर्च करत नऊ बिगे म्हणजे साडेचार एकर शेतामध्ये उन्हाळ कांद्याचे पीक घेतले. पीकही जोमदार आले. मात्र कांद्याला अपेक्षित असा बाजार भाव नसल्याने शेतामध्ये चाळ बांधून त्यामध्ये जवळपास ७०० क्विंटल कांदा साठवणूक करून ठेवला होता. चांगला भाव मिळेल त्यावेळी कांदा विक्री करण्याचे नियोजन होते.

# पुण्यात मानाच्या 5 गणपतींनंतर विसर्जित होणाऱ्या इतर मिरवणुकीवरुन रंगलं मानापमान नाट्य...

## 6 व्या क्रमांकासाठी भाऊसाहेब रंगारी आणि त्वष्टा कासार मंडळाने ठोकला दावा

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

पुण्याच्या गणेशोत्सवात खरंतर विसर्जन मिरवणूक हेच सर्वासाठी खास आकर्षण असतं. पण यंदा त्यावरूनच मानापमान नाट्य बघायला मिळतंय.मानाचे 5 गणपती हे पूर्वापार निश्चित असले तरी यंदा प्रथमच 6 व्या क्रमांकावरून चढाओढ बघायला मिळतेय.याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या पुणे सार्वजनिक गणेशोत्सवाला खरंतर शेकडोवर्षांची परंपरा आहे. पण कालानुरूप त्यात अनेक बदल होऊन अलिकडच्या काळात गणेश मंडळांकडून दरवर्षी केली आकर्षक आरास आणि 10 व्या दिवशीची विसर्जन मिरवणूक हेच दोन प्रमुख आकर्षणं गणेश भक्तांचे पाय



पुण्याकडे खेचतात. गणेश विसर्जन मिरवणुकीत परंपरेनुसार पहिली पाच गणपती मंडळं ही ठरलेली असतात. यंदाही त्याबद्दल कोणाचाच वाद नाही पण 6 व्या क्रमांकावर कोण जाणार? हा वाद मात्र, यंदा प्रथमच निर्माण झाल्याचं बघायला मिळतंय.भाऊ रंगारी ट्रस्टने यंदा 6 व्या क्रमांकावर दावा ठोकलाय.

दरम्यान, आजवरच्या परंपरेनुसार 6,7व्या क्रमांकावर जाणाऱ्या त्वष्टा कासार गणेश मंडळाने आपला नियोजित क्रम बदलण्यास ठाम नकार दिलाय. मानाच्या गणपतीनंतर पालिका कर्मचारी गणपती पाठोपाठ जाणार तर आम्हीच नाहीतर मिरवणुकीतच सहभागी होणार नाही, अशी टोकाची भूमिका मंडळाचे अध्यक्ष छोटू वडके यांनी घेतलीय. दरम्यान तिकडे, दगडूशेठ हा 4 वाजता बेलबाग चौकात येण्याचा गेल्या 2 वर्षांपासूनचा शिरस्ता यावेळी कायम राहणार असल्याचं जाहिर केलंय. त्यामुळे मिरवणुकीत भाऊ रंगारी आणि मंडई आधी की दगडूशेठ आधी सहभागी होणार? हा नवाच पेचप्रसंग निर्माण झालाय. बघुयात आगामी बैठकीत तरी या दोन्ही वादावर काही सर्वमान्य तोडगा निघतो का ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे. जगभरात आकर्षण असलेल्या पुण्यातील गणेशोत्सवात विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यावरून गणेश मंडळांमध्येच मतभेद असल्याचं समोर येत आहे. यंदा मानाच्या गणपतींआधीच शंभरहून अधिक मंडळाने एकत्रित येत निर्धार केला आहे. सकाळी सात वाजताच विसर्जनासाठी निघण्याचा निर्धार केला आहे. लक्ष्मी रस्त्यावरून सात वाजताच मिरवणूक सुरू करण्याच्या शंभर गणेश मंडळाच्या निर्णय झाला आहे.

# आता वेडंवाकडं वागलात तर मोदी सरकालाही हादरा!

## मनोज जरांगेचा इशारा

**प्रतिनिधी**
■ **धाराशिव**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या 29 ऑगस्टच्या मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. फडणवीस यांनी आंतरवाली सराटीची चूक पुन्हा करू नये. या प्रकरणी त्यांनी काही भानगड केली तर त्याची किंमत तुमच्यासह पंतप्रधान मोदींना भोगावी लागेल. ही धमकी नव्हे तर मी तुम्हाला समजावून सांगत आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी येत्या 29 ऑगस्ट रोजी मुंबईला धडक देणार आहेत. ते तिथे आझाद



मैदानावर आंदोलन करतील. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी धाराशिव शहरात मराठा समाजाची एक बैठक झाली. या बैठकीत बोलताना जरांगे यांनी मराठा समुदायाला एकजूटपणे या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. सर्वांनी 29 ऑगस्टच्या मुंबईतील आंदोलनात सहभागी व्हा. जो नेता या आंदोलनात सहभागी होणार नाही, त्याला मराठा समाजाने आगामी नगरपालिका, पंचायत समिती, महापालिका निवडणुकीत धूळ चारावी, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निर्वाणीचा इशारा दिला. आंतरवाली सराटीत झालेली चूक पुन्हा करू नका. तुम्ही काही भानगड केली तर त्याची किंमत तुमच्यासह पंतप्रधानांनाही भोगावी लागेल. एकदा आमचे डोके फुटले. अजूनही आमच्या अंगातल्या गोळ्या निघाल्या नाहीत. आंतरवालीतील माता-भगिनींना मोठे दुःख सहन करावे लागले. त्यांच्या गुडघ्याचे ऑपरेशन करावे लागले. त्यांच्या मांड्यांना टाके बसले. त्यामुळे फडणवीस साहेबांना पुन्हा सांगतो, तुम्ही पुन्हा ती चूक करू नका. त्या भानगडीत पडू नका.

# शिरपूर न्यायालयाकडून अंजली दमानिया यांच्याविरुद्ध वॉरंट जारी

**प्रतिनिधी**
■ **धुळे**

माजी महसूल मंत्री तथा तत्कालिन भाजपा नेते एकनाथ खडसे यांच्याविरोधात सन २०१६ मध्ये निराधार आरोप केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या तसंच आम आदमी पक्षाच्या माजी सदस्य अंजली दमानिया यांच्याविरुद्ध शिरपूर न्यायालयाने वॉरंट जारी केलं आहे.

या प्रकरणात शिरपूर येथील डॉ. मनोज महाजन यांनी अंजली दमानिया यांच्याविरोधात भारतीय दंड विधानातील कलम ४९९ (मानहानी) आणि ५०० (मानहानीसाठी शिक्षा) अंतर्गत फिर्याद दाखल केली होती. ही फिर्याद ॲड. अमित जैन आणि ॲड. सुधाकर पाटील यांच्या मार्फत १२ ऑगस्ट २०१६ रोजी दाखल करण्यात आली होती.

सन २०१६ मध्ये अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषदांद्वारे आणि विविध वृत्तवाहिन्यांना दिलेल्या मुलाखतीत आ. एकनाथ खडसे यांच्याविरोधात कथित स्वरूपाचे आरोप केले होते. या आरोपांमुळे खडसे यांच्यासह भारतीय जनता पक्षाची प्रतिमा मलिन झाल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या पार्श्वभूमीवर शिरपूर शहर तसंच तालुक्यातही भाजपा कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती.

# मालदोली खाडीत पाच दिवसांनंतर सापडला नीलेश अहिरेचा मृतदेह

**प्रतिनिधी**
■ **चिपळूण**

वाशिष्ठी नदीत उडी घेतलेल्या दाम्पत्यामधील नीलेश ब्रह्मण अहिरे याचा मृतदेह तब्बल पाच दिवसांनंतर २० किलोमीटर अंतरावरील मालदोली खाडीत रविवारी सायंकाळी ७:३० सापडला. त्याची पत्नी अश्विनी अहिरे हिचा मृतदेह शुक्रवारी करंबवणे खाडीत धामणदिवीनजीक सापडला होता. त्यानंतर नीलेश अहिरे याचा शोध घेण्याचे काम सुरू होते.

शहरातील गांधारेश्वर येथील वाशिष्ठी पुलावरून नीलेश आणि अश्विनी अहिरे या नवदाम्पत्याने नदीत उडी घेतल्याची घटना ३० जुलै रोजी घडली होती. या घटनेनंतर एनडीआरएफ पथक, पोलिस व अहिरे यांचे नातेवाइक या दोघांचा शोध घेत होते. या शोधमोहिमेत शुक्रवारी (१ ऑगस्ट) सकाळी धामणदिवी येथे खाडीकिनारी अश्विनी हिचा मृतदेह सापडला. कामथे येथील उपजिल्हा



रुग्णालयात उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला.

त्यानंतर नीलेशचा शोध सुरूच होता. हा शोध घेत असतानाच रविवारी सायंकाळी ७:३० वाजण्याच्या दरम्यान उडी मारलेल्या ठिकाणापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावरील मालदोली खाडीत त्याचा मृतदेह सापडला. दरम्यान, याप्रकरणी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाइल याद्वारे आता चिपळूण पोलिसांकडून तपास व चौकशी सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर साक्री धुळे येथून अनेक नातेवाईक चिपळुणात दाखल झाले, तेही शोधमोहिमेत सहभागी झाले होते. नीलेशचा शोध लागेपर्यंत ही मोहीम सुरू होती. त्यासाठी नातेवाइकांनीही स्वतंत्र बोटीची व्यवस्था केली होती. अश्विनी व नीलेश यांनी आत्महत्येचा निर्णय का घेतला, याविषयी अद्याप उलगडा झालेला नाही. नीलेश अहिरे (मूळगाव साक्री, जि. धुळे) हा शिक्षणासाठी चिपळूणमध्ये आला होता. चिपळूण येथील डीबीजे महाविद्यालयातून बारावी पूर्ण केल्यानंतर त्याने मोबाइल दुरुस्तीचे प्रशिक्षण घेतले.

# रत्नागिरीत ई-सिगारेट विक्रीवर पोलिसांचा छापा; एकाला अटक

■ **रत्नागिरी**

शहराच्या तेली आळी नाका येथील एका जनरल स्टोअरवर छापा टाकून पोलिसांनी तब्बल १ लाख ७२ हजार ५०० रुपये किमतीच्या ६९ ई-सिगारेट जप्त केल्या आहेत. याप्रकरणी दुकानमालक गोविंद दिनेश गजरा याला अटक करण्यात आली आहे.

मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील शाळकरी मुलांमध्ये कायद्याने प्रतिबंधित असलेल्या ई-सिगारेटच्या सेवनाचे प्रमाण वाढले होते. अनेकदा मुलांच्या दप्तरांमध्येही त्या सापडत होत्या. याबाबत शाळांमधील शिक्षकांनी पोलिसांकडे तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत पोलिसांनी ई-सिगारेट विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी एक विशेष पथक तयार केले.

सोमवारी (दि.४) या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, तेली आळी नाका येथील जय गगनगिरी जनरल स्टोअरमध्ये ई-सिगारेटची विक्री होत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दुकानावर छापा टाकला. या छाप्यात १ लाख ७२ हजार ५०० रुपये किमतीच्या ६९ ई-सिगारेट जप्त करण्यात आल्या. इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) कायदा २०१९ कलम ७ व ८ नुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

# खोटे दस्तावेज तयार करुन 53 गुंठे प्लॉट हडपला

## माजलगावच्या माजी नगराध्यक्षांवर शेतकऱ्यांचा आरोप

**प्रतिनिधी**
■ **बीड**

फुले पिंपळगाव येथील गट क्रमांक २० मधील ५३ गुंठे प्लॉट माजलगावचे माजी नगराध्यक्ष यांनी हडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. बोगस व खोटे दस्तावत तयार करून हा प्रकार करण्यात आला असून या विरोधात फुले पिंपळगाव येथील पीडित शेतकऱ्यांचं पोलीस अधीक्षक कार्यालय समोर उपोषण सुरू केले असून या प्रकरणी चौकशीची मागणी करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील माजी नगराध्यक्ष शेख मंजूर



यांनी माजलगाव हद्दीतील फुले पिंपळगाव येथील गट क्रमांक २० मधील तब्बल ५३ गुंठे प्लॉट खोटे दस्तऐवज तयार करून हडपल्याचा आरोप संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे. चुकीच्या पद्धतीने बनावट कागदपत्र तयार करून आणि पदाचा गैरवापर करत हा संपूर्ण प्रकार केल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. याबाबत अनेकदा चौकशीची मागणी देखील करण्यात आली आहे.

दरम्यान या विरोधात शेतकऱ्यांनी उपोषण सुरु केले असून त्यांनी असे म्हटले आहे की आमच्या मालकी हक्काची जमीन असताना गायरान धारक जमीन असताना देखील खोटे कागदपत्रे तयार केले. तसेच नगराध्यक्षपदाचा गैरवापर करत हे संपूर्ण दस्ताऐवज तयार केले आहेत. अधिकाऱ्यांना हाताखाली धरून हा संपूर्ण प्रकार केल्याचा आरोप उपोषणकर्ते शेतकऱ्यांनी केला आहे. या विरोधात आंदोलन पुकारण्यात आले आहे. दरम्यान याप्रकरणी मागासवर्ग आयोगामध्ये तक्रार केली होती.

# निशिकांत दुबेविरोधात मनसे कोर्टात

## नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात अवमान याचिका

■ **नाशिक**

हिंदी - मराठीच्या वादाच्या आगीत सातत्याने तेल ओतण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजप खासदार निशिकांत दुबे यांना अखेर मनसेने कोर्टात खेचले आहे. मनसेच्या येथील एका पदाधिकाऱ्याने दुबे यांच्याविरोधात अवमाननेची याचिका दाखल करत त्यांना मनसेच्या स्टाईलने धडा शिकवण्याचा इशारा दिला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मनसेचे नाशिक शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांनी निशिकांत दुबे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात अवमानना



याचिका दाखल केली आहे. कोंबडे यांनी गत 14 जुलै रोजी एक पत्रकार परिषद घेतली होती. त्यात त्यांनी दुबे यांना महाराष्ट्रातील जनतेची माफी मागा, अन्यथा अवमाननेच्या कारवाईला सामोरे जा असा इशारा दिला होता. पण त्यानंतरही दुबे यांनी या प्रकरणी माफी मागितली नाही. त्यामुळे कोंबडे यांनी त्यांच्याविरोधात अवमाननेचा दावा दाखल केला आहे. त्याच्या या कारवाईमुळे आगामी महापालिका निवडणुकीत मराठी - अमराठीचा वाद चांगलाच गाजण्याची शक्यता आहे.

सुदाम कोंबडे याविषयी बोलताना म्हणाले की, भाजपचे मुजोर खासदार निशिकांत दुबे यांना आम्ही 15 दिवसांपूर्वी नोटीस बजावली होती. या नोटीसीद्वारे मराठी भाषा तथा राज व उद्धव ठाकरे यांच्याविषयी त्यांनी केलेल्य विधानाविषयी माफी मागण्याची मागणी केली होती.

# प्रशिक्षकाकडून तरुणीकडे शरीरसुखाची मागणी

## पोलीस भरती प्रशिक्षण अकॅडमीतील प्रकार

**प्रतिनिधी**
■ **भंडारा**

महिला, तरुणींची छेळछाळ करण्याचे प्रकार थांबलेले नाहीत. यातच भंडाऱ्यातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमीच्या प्रशिक्षकाकडून अकॅडमीत प्रशिक्षण घेणाऱ्या तरुणीकडे शरीर सुखाची मागणी केली आहे. या प्रकरणी तरुणीने दिलेल्या तक्रारीनंतर अड्याळ पोलिसांनी प्रशिक्षकाला अटक केली आहे.

तरुणी- महिलांवरील अत्याचार तसेच छेळछाळ करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे तरुणी सुरक्षित नाहीत. यातच भंडारा शहरात धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामध्ये पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या एका ॲकॅडमीच्या प्रशिक्षकाकडून त्याच्याकडे प्रशिक्षण घेणाऱ्या एका तरुणीला शरीर सुखाची मागणी केली. एवढ्यावरचं हा ॲकॅडमीचा शिक्षक थांबता नाही; तर त्याने तरुणीच्या मित्राला जातीवाचक शिवीगाळ केली.

नितेश हिवरकर (वय ३९, रा. सोनेगाव ठाणे ता. पवनी, जि भंडारा) असं आरोपी प्रशिक्षकाचं नाव आहे. हा गंभीर प्रकार भंडाऱ्याच्या अड्याळ इथं घडला असून याप्रकरणी अड्याळ पोलिसांनी तरुणीच्या मित्राच्या तक्रारीवरून ॲकॅडमीच्या प्रशिक्षकाविरुद्ध तक्रार दिली.

# रत्नागिरीतही उमटली पुणेरी पाटीची झलक

## बेशिस्त वागणाऱ्या वाहनचालकांना शब्दांचा मार

**प्रतिनिधी**
■ **रत्नागिरी**

पुणेरी पाट्यांची चर्चा सर्वत्र होत असते. मात्र, अशीच एक पाटी रत्नागिरी शहरातही पाहायला मिळत असून, या पाटीची सध्या चर्चा रंगू लागली आहे. ही पाटी म्हणजे 'कोणीही यावे आणि गाडी लावून जावे' असे वागणाऱ्या वाहनचालकांसाठी शब्दांचा मार ठरत आहे.

अलीकडे कोणीही कोठेही वाहन उभे करून निघून जातात. उभी केलेली गाडी कोणाच्या घरासमोर आहे, कोणाच्या दुकानासमोर आहे की, कोणाच्या वाटेत आहे, हे न




पाहताच बिनधास्त गाडी उभी केली जाते. मात्र, यामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागतो याचे भान वाहनचालकांना राहत नाही. वारंवार गाडी उभी करून नाहक मनस्ताप सहन करावा लागणाऱ्या काही मंडळींनी आता थेट 'पुणेरी पाटी'चाच वापर केला आहे.

रत्नागिरी शहरातील मारुती मंदिर येथे नाचणे मार्गाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ ही पाटी लावण्यात आली आहे. या पाटीवर ठळक अक्षरात 'माणसांसाठी नो पार्किंग, गाढवांसाठी राखीव' असे लिहिलेले आहे. या पाटीमुळे त्या परिसरात गाडी उभी करणाऱ्यांना आता न बोलता शब्दांचा मार देण्यात आला आहे.

# 'शिवसेनेचा बाप मीच' म्हणणाऱ्या आमदार फुकेंकडून दिलगिरी व्यक्त

**प्रतिनिधी**
■ **भंडारा**

भंडाऱ्यातील भाजप कार्यकर्ता मेळाव्यात भाजप नेते परिणय फुके यांनी शिवसेनेचा बाप मीच असे शिवसेनेबाबत बोलताना वादग्रस्त वक्तव्य केले होते. दरम्यान फुके यांच्या या वक्तव्यानंतर शिवसेना शिंदे गटाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. फुके यांनी माफी मागावी अन्यथा, शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ असा इशारा या पत्रकार परिषदेमधून शिवसेनेनं फुके यांना दिला गेला होता. आता राज्यभर आरोप प्रत्यारोपांच्या चौफेर फैरी झाल्यानंतर भाजप नेते परिणय फुके यांनी आपल्या वक्तव्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली आहे.

दिलगीरी व्यक्त करताना फुके म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या भंडारा येथील मेळाव्यात कार्यकर्त्यांना संबोधित करताना



मी केलेल्या एका विधानामुळे महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा गैरसमज झाला आहे. वास्तविक मला तसे बोलायचे नव्हते. कुणाला दुखविण्याचा माझा हेतू सुद्धा नव्हता. माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला आहे. परंतु, माझ्या विधानामुळे आमच्या मित्र पक्षातील शिवसेनेचे पदाधिकारी- कार्यकर्त्यांच्या भावना दुखवल्या असतील तर त्याबद्दल मी मनापासून सर्वांची दिलगिरी व्यक्त करतो.

माझ्यावर अनेकांनी खापर फोडले. मी काही कोणाच्या आरोपाला उत्तर देत नाहीत. पण त्या दिवशी मला हे माहीत झाले की, कसे असते तुमच्या घरी जर पोराला चांगले मार्क मिळाले, तर कोणाचे कौतुक होते पोरगा किंवा आई. काही चांगले झाले तर कोणी केले आईने केले आणि जर काही खराब झाले तर कोणी केले, बापाने केले. त्या दिवशी मला हे पक्क माहीत झाले की शिवसेनेचाही बाप मीच आहे.भाजप पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात भाजप आमदार परिणय फुके यांनी शिवसेना पक्षाबाबत वादग्रस्त विधान केले होते. यावरून शिवसेना शिंदे गटाचे लोकसभा प्रमुख संजय कुंभलकर यांनी पत्रकार परिषद घेत फुके यांनी १२ तासांच्या आत त्यांच्या विधानाबद्दल माफी मागावी अन्यथा आम्ही शिवसेना शैलीत त्यांना योग्य उत्तर देऊ,असा इशारा दिला होता.

**नोटीस**

श्रीमती अनुसया मोतीराम शेलार यांनी दि. १५/१०/२०१० रोजीच्या गिफ्ट डीडद्वारे जे, बोरिवली १ च्या सब रजिस्ट्रार कार्यालयात, नोंदणी क्र. ९४३०/२०१० दि. १५/१०/२०१० रोजी नोंद झाली आहे व शेअर सर्टिफिकेट क्र. ०३४ अंतर्गत, विशिष्ट क्र. १६६ ते १७० असलेल्या सोसायटीच्या ५ (प्रत्येकी रु.५०/-) शेअर्ससह सदनिका क्र. बी-०४, तळ मजला, श्री सिद्धिविनायक सीएचएसएल, बेस्ट नगर, गजानन महाराज पथ, गोरेगाव पश्चिम, मुंबई ४००१०४, श्रीमती आरती चंद्रकांत मोरे आणि श्री. चंद्रकांत जिवाजी मोरे यांना भेट म्हणून दिले होते.

श्रीमती आरती चंद्रकांत मोरे यांचे ०७.०४.२०१४ रोजी निधन झाले आणि सोसायटीने २२.०५.२०१४ रोजी सोसायटीच्या उपनियमांनुसार औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, सदनिका क्र. बी-०४ धारक मृत सदस्याचे हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध श्री. चंद्रकांत जिवाजी मोरे यांना हस्तांतरित केले आणि तेव्हापासून ते या सदनिका मध्ये शांततेत वास्तव्य करत आहेत.

१५/१०/२०१० रोजीचा मूळ नोंदणीकृत गिफ्ट डीड आणि नोंदणी पावती हरवली /गहाळ झाली आहे आणि माझ्या क्लायंटला ती सापडत नाही आणि गोरेगाव पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार नोंदवली आहे, ज्याची हरवल्याची नोंद, लोस्ट रिपोर्ट १०१८७५-२०२५ दिनांक ०५/०८/२०२५.

श्री. चंद्रकांत जिवाजी मोरे यांनी दावा केला आहे की त्याचा सदर सदनिकांचे हक्क सर्व प्रकारच्या भार, शुल्क, दावे इत्यादींपासून मुक्त आहेत आणि त्यांच्याकडे स्पष्ट आणि विक्रीयोग्य शीर्षक आहे आणि त्यांनी मला नो क्लेम प्रमाणपत्र जारी करण्याची विनंती केली आहे.

सर्व व्यक्तींना याद्वारे सूचित केले जाते की त्यांनी सदर हरवलेल्या कागदपत्राच्या आधारे कोणाशीही व्यवहार करू नये किंवा कोणताही व्यवहार करू नये आणि वारसदार किंवा इतर दावेदार / आक्षेप घेणाऱ्यांकडून त्यांच्या दाव्यांचे / आक्षेपांचे समर्थन करण्यासाठी संबंधित कागदपत्रांसह सोसायटीचे सदर शेअर्स हस्तांतरित करण्यासाठी दावे किंवा आक्षेप मागवत आहे, ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून सात दिवसाचं कालावधीत कोणताही दावा न झाल्यास, हरवलेल्या कराराच्या आधारे आणि हस्तांतरणासाठी दावे / आक्षेपांच्या आधारे मालमत्तेवर कोणताही दावा नाही असे मानले जाईल, आणि मी माझ्या क्लायंटने विनंती केल्यानुसार नो क्लेम प्रमाणपत्र जारी करेन आणि त्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

**ठिकाण : मुंबई**
**तारीख: ०६.०८.२०२५.**

**सही,**
**ॲड. विशाल एस. भाबल**
**२०१, अशोक दर्शन, शंकर मंदिराजवळ, कोळीवाडा,**
**राम मंदिर रोड, भाईंदर पश्चिम- ४०११०१,**
**मोबाईल क्र. ९३७२८०४३६७, ईमेल: advocatevbhabal@rediffmail.com**

## श्री सूर्यवंशी क्षत्रिय परस्पर सहाय्यक मंडळातर्फे भव्य बुद्धिबळ स्पर्धा यशस्वी आयोजन

**मुंबई :** श्री सूर्यवंशी क्षत्रिय परस्पर सहाय्यक मंडळ व NS Chess Academy यांच्या संयुक्त विद्यमाने माहिम येथील सूर्यवंशी क्षत्रिय हॉलमध्ये रविवार, ३ ऑगस्ट २०२५ रोजी बुद्धिबळ स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १७० हून अधिक स्पर्धकांनी विविध वयोगटांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. U/8 ते खुला गट अशा विभागांमध्ये झालेल्या या स्पर्धेत विजेत्यांना चषक, प्रमाणपत्रे व मेडल देऊन गौरविण्यात आले, तर सर्व सहभागी खेळाडूंना प्रोत्साहनपर भेटवस्तू देण्यात आल्या. या कार्यक्रमात बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाचे विश्वस्त श्री. जीवन भोसले व डॉ. निलेश मानकर यांची विशेष उपस्थिती लाभली. मंडळाच्या पदाधिकारी, स्वयंसेवक व पालकांच्या सहकार्यामुळे स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरली.





## लाख चुका असतील केल्या...

इंग्रजांच्या घरात जाऊन त्यांना पराभूत करणे ही सोपी कामगिरी नाही. पण शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील युवा टीम इंडियाने पाच कसोटींच्या मालिकेत गोऱ्या साहेबांना २-२ असे बरोबरीत रोखत देदीप्यमान असा इतिहास घडवला आहे. या शानदार कामगिरीत सिंहाचा वाटा उचलण्याचे काम जसप्रीत बुमराह,कर्णधार शुभमन गिल ,के एल राहुल ,सलामीवीर यशस्वी जैस्वाल,प्रसिद्ध कृष्ण,आकाश दीप आणि जिगरबाज वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज यांनी केले. सुरुवातीच्या ४ कसोटी आणि शेवटच्या निर्णायक कसोटी लढतीत इंग्लंडच्या फलंदाजांचे सोपे झेल सोडून भारतीय क्षेत्ररक्षकांनी यजमानांना वरचढ होऊ दिले. खरेतर पहिली कसोटी सोडता पुढच्या चार लढतीत टीम इंडियाने इंग्लिश संघाच्या तोडीस तोड कामगिरी साकारली होती. पण झेल सोडण्याची चूक भारतीय संघाच्या अंगलट आली. कर्णधार गिलसह प्रमुख फलंदाज काही अपवाद वगळता धावांचा मोठा रतीब टाकत होते. पण काही चुकांमुळे भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले.मैदानात जिव तोडून गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करणाऱ्या सिराजने ओव्हाल कसोटीत शतकवीर हॅरी ब्रूक्सचा झेल सीमारेषेवर पकडला. पण अनवधानाने त्याचा पाय बाउंड्रीला लागला आणि टीम इंडिया पराभवाच्या खाईत सापडली होती. जैस्वालनेही असेच झेल सोडत यजमान संघाला मोठ्या संधी दिल्या होत्या.पण ओव्हल कसोटीत सिराज आणि जैस्वाल दोघांनीही जिवतोडून कामगिरी साकारत आपल्या या चुकांची योग्य भरपाई केली. विशेष म्हणजे 'मॅच विनर' जसप्रीत बुमराह खेळत नसताना टीम इंडियाने मिळवलेले दोन विजय खरेच लक्षणीय ठरले. कसोटी मालिका बरोबरीत सोडवून भारतीय संघाने त्यांना कमी लेखणाऱ्या ब्रिटिशाना चांगलेच वठणीवर आणले. म्हणूनच गायक अरुण दाते यांच्या 'लाख चुका असतील केल्या ,केली पण प्रीती' या गाण्यांचे सूर सिराज व जैस्वालच्या पराक्रमी कामगिरीमुळे तोंडावर आल्या.

**नवनाथ दांडेकर**

इंग्लंड दौऱ्यावर युवा भारतीय क्रिकेट संघ गेला ,तेव्हा काही मुजोर ब्रिटिश खेळाडूंनी टीम इंडिया आम्हाला ॲशेस मालिकेसाठीची प्रॅक्टिस द्यायला आलाय. ते आम्हाला पराभूत करूच शकत नाहीत अशा वल्गना केल्या होत्या.मैदानातही इंग्लंडचे खेळाडू अपमानास्पद टिप्पण्या आणि वर्तन करून भारताच्या युवा क्रिकेटपटूंचे मनोधैर्य खच्ची करण्याचे प्रयत्न करीत होते. पण गिल आणि कंपनीने इंग्लंड संघाला त्यांची जागा दाखवून देण्याचे काम या मालिकेतील कामगिरीने केले. विशेषतः प्रसिद्ध कृष्ण ,आकाश दीप आणि मोहम्मद सिराज या वेगवान गोलंदाजांनी इंग्लंड संघाच्या फलंदाजांना त्यांच्याच भूमीत चितपट करण्याचे काम फत्ते केले. त्यांच्या या कामगिरीला इंग्लंड दौऱ्यात कसोटी शतकाची माळ लावणारा कर्णधार शुभमं गिल ,सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि अनुभवी के एल राहुल यांनी साथ दिली. विशेष अभिनंदन करावे लागेल ते म्हणजे अष्टपैलू कामगिरी करीत चौथी कसोटी आर्णीत राखणारे शतकवीर रवींद्र जाडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांचे.युवा टीम इंडियाने अखेर आपली माजी विश्वविजेते ही उपाधी सार्थ ठरवत इंग्लंड संघाचा माज उतरवला आहे.

यंदाच्या या कसोटी मालिकेत खरे कौतुक करावे लागेल ते वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि सलामीवीर यशस्वी जैस्वाल यांचे. आधीच्या लढतीत सोपा झेल सोडून इंग्लंडला विजयाची संधी देणारा यशस्वी जैस्वाल टीकेचा धनी ठरला होता. त्याच्या बॅटमधून धावाही निघत नव्हत्या.पण या मुंबैकर पठ्ठ्याने शेवटी कसोटी आपल्या शतकी खेळीने अविस्मरणीय ठरवली.त्याच्या शतकी खेळीमुळेच मग मोहम्मद सिराज,प्रसिद्ध कृष्ण आणि आकाश दीप या वेगवान गोलंदाजांनी इंग्लिश संघाची दाणादाण उडवत एक रोमहर्षक कसोटी विजय साकारत इंग्लंडच्या मुजोर संघाला एक सणसणीत चपराक हाणण्याचे काम केले. बुमराहशिवाय टीम इंडिया जिंकू शकते हा विश्वास या वेगवान त्रिकुटाने आपल्या नेत्रदीपक कामगिरीने सार्थ ठरवला.३१ वर्षीय मोहम्मद सिराज ब्रूक्सचा सोपा झेल हुकल्याने पराभवाचा धनी ठरणार होता. पण जिगरबाज सिराजने आपल्या या मोठ्या चुकीचे परिमार्जन करायचे ठरवले. मैदानात त्याने जीव तोडून गोलंदाजी केली. 'वेडात दौडले वीर मराठे सात ' या मराठ्यांच्या पराक्रमाचे गुणगान गाणाऱ्या गीताच्या ओळी पाठवाव्यात अशी कामगिरी आपल्या या मोहम्मद सिराजने केली.शेवटच्या पाचव्या दिवशी ओव्हलवर सुस्साट आणि तुफान गोलंदाजी करीत सिराजने ३ इंग्लिश फलंदाजांना बाद करीत संघाच्या विजयाचा पाय रचला आणि प्रसिद्ध कृष्णाने अगदी 'गोवर्धन पर्वत' करांगुलीने उचलणाऱ्या भगवान कृष्णाची आठवण आपल्या शानदार गोलंदाजीने भारतीय क्रिकेट शौकिनांना करून दिली. पण या विजयाचा खरा हिरो ठरला तो हैद्राबादच ३१ वर्षीय मोहम्मद सिराज .

या मोहम्मदने कृष्णाच्या साथीने इंग्लंडचा डाव उध्वस्त करण्याचा भीम पराक्रम साकारला आणि भारतीय क्रिकेट शौकिनांना पवित्र श्रावण महिन्याची गोड भेट दिली. सिराज अखेरच्या क्षणी देशासाठी प्राणपणाने लढला भारतीय क्रिकेटशौकिनांसाठी तो विजयाचा 'महाराज' ठरला.त्याची मैदानातील देहबोली आणि आक्रमकता पाहता देशासाठी झुंजण्याची त्याची जिगर याचे आपण सर्वांनी मनापासून कौतुक करायला हवे.शुभमन गिलच्या आणि त्याच्या युवा इंडिया ब्रिगेडच्या कामगिरीला सलाम करायला हवंय. आपले हे युवा हिरो मायदेशी परततील तेव्हा त्यांचे ऐतिहासिक स्वागत व्हायला हवेय एव्हढेच वाटते.



## ओव्हलवर टीम इंडियाच्या विजयाचा जल्लोष

# भारताच्या विजयानंतर गावसकर यांनी इंग्लंडमध्ये गायलं 'मेरे देश की धरती...' हे देशभक्तीपर गाणे

### कसोटीपटू पुजारासह समालोचकांनीही दिली साथ



वृत्तसंस्था
■ लंडन

ओव्हल कसोटी भारताने दणदणीत विजय मिळवला. मोहम्मद सिराजचे ९ बळी आणि प्रसिध कृष्णाच्या साथीने युवा टीम इंडियाने इंग्लंडला पराभवाचं पाणी पाजलं. अखेरच्या दिवशी भारताला विजयासाठी ४ विकेट्सची गरज असताना सिराज आणि प्रसिधने भेदक गोलंदाजी करत विजय मिळवून दिला. या विजयानंतर ओव्हलच्या मैदानावरील चाहत्यांनीही कमालीचं सेलिब्रेशन केलं. यामध्ये 'लिटल मास्टर' सुनील गावसकरही मागे राहिले नाहीत. त्यांनी मैदानात 'मेरे देश की धरती ...' हे देशभक्तीपर गाणे म्हणत आपला आनंद व्यक्त केला.त्यांना कसोटीपटू चेतेश्वर पुजारासह समालोचक आणि अन्य मान्यवरांनी साथ दिली.

सुनील गावसकर कायमच भारताच्या विजयाचं सेलिब्रेशन करताना दिसले आहेत. कधी लहान मुलाप्रमाणे मैदानात नाचत तर कधी उड्या मारत त्यांना विजयाचं सेलिब्रेशन केलं आहे. आता ओव्हल कसोटीतील टीम इंडियाच्या विजयानंतर गावसकर यांनी इंग्लंडच्या भूमीवर उभं राहून 'मेरे देश की धरती...' हे गाणं गायलं आहे. भारताच्या कसोटीपटू पुजारासह इतर कॉमेंटेटर्सनी देखील त्यांना साथ दिली.

गावसकर यांचे लकी जॅकेट भारताच्या विजयामुळे खरोखरचं पुन्हा एकदा लकी ठरलं. भारताने गाबानंतर इंग्लंडमध्येही ऐतिहासिक विजय नोंदवला. भारताच्या संपूर्ण संघाने ओव्हल कसोटी विजयात आपली भूमिका निभावली आहे. मोहम्मद सिराज या सामन्याचा सामनावीर ठरला, ज्याने ९ विकेट्स घेतल्या.

### लकी जॅकेट घालत इंग्लंडमध्ये विजयानंतर गायलं गाणं

कसोटी सामन्याचा निकाल जाहीर झाल्यानंतर, सुनील गावसकर मैदानावर आले आणि त्यांनी गाणं गात अनोख्या पद्धतीने आनंद साजरा केला. मैदानावर उतरून त्यांनी देशभक्तीपर गीत गायलं. टीम इंडियाच्या विजयी फेरीनंतर, माजी कर्णधार सुनील गावसकर ओव्हलच्या मैदानावर 'मेरे देश की धरती सोना, उगले-उगले हीरे मोती...' हे गाणं गात त्यावर नृत्य करत होते. गाण्याच्या वेळी सुनील गावसकर यांनी त्यांचं तेच लकी जॅकेट घातले होते, जे त्यांनी गाबा २०२१ मध्ये टीम इंडियाच्या विजयादरम्यान देखील घातलं होतं.

## बीचवरील जीवरक्षकांची मोठी कामगिरी

# जुहू बीचवर 9 तर आक्सावर 2 मुलांना वाचविण्यास यश



प्रतिनिधी
■ मुंबई

रविवार सुट्टीच्या दिवशी जुहू आणि आक्सा समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात पर्यटक आले होते. यावेळी १४ वर्षांखालील काही मुले हे पाण्यामध्ये पोहण्यासाठी तर काही खेळण्यासाठी समुद्रात उतरली होती. ती पोहता- पोहचा खोलपर्यंत गेली होती. त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ती बुडत असल्याचे जीवरक्षकांच्या निदर्शनास आली, बीचवर तैनात असलेल्या जीवरक्षकांनी क्षणाचाही विलंब न करता, तात्काळ बीचकडे धाव घेवून त्यांचा जीव वाचविला. यात जुहू बीचवर ९ तर आक्सावर २ मुलांचा समावेश होता. जीवरक्षकांच्या या कार्यामुळे त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव केला जात आहे. येथील आक्सा समुद्रकिनाऱ्यावर मायनर रेस्क्यू केलेली दोन्ही मुले ही मालाड पूर्वकडील १४ वर्षांची होती. पाण्यात खेळत असतांना, रिप करंटमुळे दोन्ही मुले अचानक ५० मीटर पाण्यात ओढली गेली. यादरम्यान ड्युटीवर असलेल्या जीवरक्षक राहुल ठाकूर, हर्षल मेहेर आणि मान वैती यांना ती दिसली. त्यांनी ताबडतोब रेस्क्यू ट्यूबने पाण्यात उतरून मुलाला पाण्यातून सुरक्षित बाहेर काढले. आणि नंतर दोन्ही मुलांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

## पालिकेने गणपती विसर्जनासाठी वर्सोव्यात सुविधा द्याव्यात - आंबेरकर

**मुंबई:** अंधेरी पश्चिम येथे सातबांगला आणि वर्सोवा गावात मोठ्या प्रमाणात गणपती विसर्जन होत असते. तिथे आयोजकांवर खूप मोठा ताण पडतो.पालिकेने वर्सोवा गावात गिरगाव व माहीम येथे ज्या प्रकारे सोयी सुविधा उपलब्ध करून देते त्याप्रमाणे जर दिल्या तर त्या भक्तांच्या दृष्टीनेही चांगले होईल व तिथे १८ - २० फूट उंच मोठ्या गणेश मूर्तींचेही विसर्जन सुरळीत होऊ शकेल." अशी मागणी अंधेरी पश्चिम येथील स्वप्नाक्षय मित्र मंडळाचे सर्वेसर्वा, पालिकेचेचे माजी विरोधीपक्ष नेते देवेंद्र (बाळा) आंबेरकर यांनी काल पालिकेने बोलावलेल्या बैठकीत केली. बृहन्मुंबई महापालिकेने काल परेल येथील एफ दक्षिण विभाग कार्यालयात उपयुक्त परिमंडळ २ प्रशांत सपकाळे यांच्या अध्यक्षतेखाली गणेशोत्सव मंडळांसमवेत पूर्वतयारीसाठी बैठक बोलावली होती तेव्हा पालिका अधिकाऱ्यांनी देवेंद्र आंबेरकर यांच्या सूचनेबाबत सकारात्मक उत्तर दिले.

# आज बेस्ट मधून सेवानिवृत्त झाल्यानंतर देणी न मिळालेल्या कामगारांचा आझाद मैदानात मोर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमात सेवा करून १ ऑगस्ट, २०२२ नंतर सेवानिवृत्त झालेल्या ४,५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी व इतर देणी तातडीने देण्यात यावी या करिता आज बुधवार, ६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वा. आझाद मैदान येथे बेस्ट उपक्रमाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या आणि बेस्ट उपक्रमात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार आहे. असे दि बी.ई.एस.टी. वर्कर्स युनियनचे सरचिटणीस शशांक राव यांनी सांगितले.

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ व बेस्ट वर्कर्स युनियन बरोबर झालेल्या कराराचे उल्लंघन करून १ ऑगस्ट, २०२२ नंतर निवृत्त झालेल्या ४,५०० हून अधिक सेवा निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी व इतर देणी युनियनने वारंवार पत्र व्यवहार / निवेदन देऊन ही अद्याप बेस्ट उपक्रमाकडून देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे कर्मचारी आर्थिक संकटात आलेले आहेत.

बेस्ट प्रशासनाने सेवानिवृत्त झालेल्या कामगारांना त्यांची ग्रॅच्युइटीची रक्कम तत्काळ द्यावी आणि जे कर्मचारी भविष्यात बेस्टच्या सेवेतून सेवा निवृत्त होणार आहेत, त्यांना सेवा निवृत्तीची देय्य असलेली रक्कम तातडीने मिळावी त्याचे नियोजन बेस्ट प्रशासनाने करावे यासाठी हा मोर्चा काढण्यात येत असल्याचे.शशांक राव यांनी सांगितले.



**मुंबई:** महाराष्ट्र कॅरम संघटनेचे सचिव आणि आंतराष्ट्रीय कॅरमपटू अरुण केदार यांनी महाराष्ट्रासह देशात कॅरम खेळाचा प्रसार आणि प्रचार व्हावा. कॅरम खेळाला केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडूनही आवश्यक मदत मिळावी या उद्देशाने नुकतीच केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीया यांची भेट घेत त्यांच्याशी सकारात्मक चर्चा केली. युवा पिढीसह आबाल-वृद्धांत लोकप्रिय ठरलेल्या कॅरम खेळाला केंद्र सरकार आवश्यक ती सर्व मदत देईल असे आश्वासन यावेळी क्रीडामंत्री मांडवीया यांनी केदार यांना दिले. यावेळी सोबत महाराष्ट्र कॅरम संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र शाह हेदेखील उपस्थित होते.

# म्हाडा छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे 1323 निवासी सदनिका व 18 भूखंडांच्या सोडतीद्वारे विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी

### अर्ज भरणा प्रक्रियेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अखत्यारीतील छत्रपती संभाजीनगर शहर-जिल्हा, बीड मधील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १ हजार ३२३ निवासी सदनिका व १८ भूखंडांच्या ऑनलाइन संगणकीय सोडतीद्वारे विक्रीकरिता https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेला ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. दत्तात्रय नवले यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे जाहीर सोडत तीन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ हजार १४८ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १५४ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत २१ सदनिका व १८ भूखंडांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजी नगर मंडळाच्या संगणकीय सोडतीसाठी एकात्मिक गृहनिर्माण सोडत व्यवस्थापन प्रणाली म्हणजेच Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) या नूतन संगणकीय प्रणाली व ॲपवर सदनिकांच्या अर्ज नोंदणी व अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते दि. ३० जून २०२५ रोजी प्रारंभ करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत सहभाग घेण्याकरिता दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे. दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११. ५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. दि. ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS/NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदारच या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप यादी दिनांक दि. ०८ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता अंतिम पात्र अर्जांची यादी जाहीर केली जाणार आहे. दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संगणकीय सोडतीचा कार्यक्रम होणार आहे.

मंडळाने पूर्वी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीतील व माहिती पुस्तिकेतील काही अटी व शर्तींमध्ये मंडळातर्फे बदल/दुरूस्ती केली असून मंडळाने उत्पन्नाचा पुरावा आर्थिक वर्ष दि. ०१.०४.२०२४ ते दि. ३१.०३.२०२५ या कालावधीतील घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्या अर्जदारांनी यापूर्वी म्हणजेच सदर निवेदन प्रसिध्द होण्यापुर्वी आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चे उत्पन्न प्रमाणपत्र तसेच आयकर विवरणपत्र सादर करून अनामत रकमेचा भरणा केलेला आहे त्या अर्जदारांनी विहित वेळेत आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या कालावधीतील उत्पन्नाचा पुरावा सादर करावा.

# शिवसेनेच्या दणक्यानंतर रामजी आशर शाळेतील हिंदीची परीक्षा रद्द



■ मुंबई

घाटकोपर पूर्वेला असलेल्या रामजी आशर (सी डी एम भाटिया) या शाळेत इयत्ता तिसरी च्या वर्गातील विद्यार्थ्यांची सक्तीने हिंदी परीक्षा घेण्यास सांगितले होते. याबाबत विद्यार्थी व त्यांच्या पालकांवर प्रचंड दबाब आला होता, सदर पालकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे याबाबत तक्रार करत,आम्हाला न्याय मिळवून द्या, अशी विनंती केली होती.

सदर गंभीर प्रकरणाची दखल घेऊन शिवसेनेच्या शिष्टमंडळाने शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. निशा मोहनदास यांना याबाबत जाब विचारला. एकीकडे तुमच्या शाळेत मराठी, इंग्रजी, गुजराती या तीन भाषेची सक्ती असताना आणखी चौथी हिंदी भाषा सक्ती कशाला हवी, या नंतर त्यांनी आपली चूक मान्य करत शाळेतर्फे नवीन वेळापत्रक जारी केले गेले तसेच हिंदी भाषेची परीक्षा रद्द करत त्या परीक्षेचे गुण इतर दुसऱ्या परीक्षेत वळते केले जातील, असे शाळेने शिष्टमंडळाला सांगितले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा संघटक अशोक वंडेकर, प्रसाद कामतेकर, विधानसभा कार्यालयप्रमुख प्रकाश वाणी, उपविभागप्रमुख अजित गुजर, अजित भायजे, शाखाप्रमुख सुनील भोस्टेकर, नरेश माटे, सत्यवान कवळे रामपाल, हृदयनाथ राणे,महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेनेचे सचिव सचिन भांगे,शाखासंघटक चंद्रकांत हळदणकर,संतोष पिंगळे,दिनकर मांडले उपस्थित होते.

# विधवा महिला पेन्शन योजनेची रक्कम 1,500 वरुन रुपये 5000 करा!

### खा. रविंद्र वायकर यांचे मंत्री अदिती तटकरे यांना पत्र

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यातील असंख्य दिन दुबळ्या महिलांच्या जगण्यासाठीचा आधार असलेल्या विधवा महिला पेन्शन योजनाच्या वार्षिक उत्तपन्नाच्या मर्यादेत वाढ करण्यात यावी तसेच मासिक पेन्शनची रक्कम रुपये १,५०० वरून रुपये ५,००० करण्यात यावी अशी मागणी, मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी ल महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सचिव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

हि योजना महिला व बालविकास विभागामार्फत महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. हि योजना राज्यातील दिन दुबळ्या महिलांसाठी जगण्याचा एकमेव आशेचा किरण आहे. परंतु अनेक महिलांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. याचे कारण तहसीलदार यांच्याकडून त्या महिलांच्या परिवाराचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला हा रुपये २१,००० इतका लागत आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत २१,००० म्हणजे मासिक १,७५० वेतन हे सामान्यातील सामान्य परिवार इतक्या वेतनामध्ये परिवाराचे पालन पोषण करू शकत नाही.

मुंबई मध्ये एखादी सामान्य घरकाम करणारी महिला हि मासिक ८,००० ते १०,००० इतके वेतन मिळवते. त्यामुळे सदर वार्षिक उत्पन्न २१,००० च्या नियमावलीत बदल करून वार्षिक वेतन १,००,००० च्या आत करणे आवश्यक आहे. जेणेकरून विधवा महिलांना त्याचा लाभ घेता येईल. तसेच मुंबई महापालिकेद्वारा विधवा महिलेस पेन्शन देण्याची सुविधा करण्यात आल्यास महाराष्ट्रातील कित्येक महिलांना या योजनीचा लाभ घेणे शक्य होणार आहे, असे खासदार वायकर यांनी मंत्री तटकरे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. तसेच नियमावलीत काही बदलहि त्यांनी सुचवले आहेत.

यात अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ व डिजिटल स्वरूपात उपलब्ध करावी. उत्पन्न व इतर अटींमध्ये लवचिकता ठेवून गरजूंना न्याय द्यावा, रुपये १,५०० असलेली पेन्शन रक्कम सध्या महागाईच्या पार्श्वभूमीवर रुपये ५,००० प्रती महिना करण्यात यावी. या सूचनांचा सहानभूतीपूर्वक विचार करून निर्णय घ्यावा अशी मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे महिला व बालविकास मंत्री तसेच सचिव यांना केली आहे.

# दादर नंतर आता जीपीओसमोरील कबुतरखानाही होणार बंदिस्त



प्रतिनिधी
■ मुंबई

कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि पिसे यांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने कबुतरखाने पालिकेच्या रडारवर आले आहेत. महापालिकेने कबुतरांचा त्रास रोखण्यासाठी शनिवारी रात्री उशिराने ताडपत्री टाकून दादर येथील कबुतरखाना बंदिस्त केला. आता दादर पाठोपाठ फोर्ट परिसरातील जीपीओ समोरील कबुतरखानाही बंदिस्त करण्याची तयारी महापालिका वार्ड स्तरावर सुरू करण्यात आली आहे. कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि पिसे यांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने मनसे पक्ष आणि अनेकांकडून कबुतरखाने बंद करण्याची, त्यावर कारवाईची मागणी केली होती.

दरम्यान, प्रकरण न्यायालयात गेले. त्याचवेळी, राज्य विधिमंडळ पावसाळी अधिवेशनात शासनाने कबुतरखाना बंद करण्याचे फर्मान काढले. तसेच, गेल्या काही दिवसांपासून महापालिकेने विविध ठिकाणी कबुतरांना दाणे खायला घालणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगाही उगारला आहे. त्याचप्रमाणे, न्यायालयानेही कबुतरांच्या प्रकरणावरून नाराजी व्यक्त करीत शासन, महापालिकेला फटकारल्यानंतर राज्य शासनाच्या आदेशाने मुंबई महापालिकेने मुंबईतील कबुतरखान्यांच्या ठिकाणी त्यांना दाणे खायला घालणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला. त्यानंतरही कबुतरांना दाणे घालणे सुरूच राहिल्याने अखेर पालिकेने कबुतरखाने बंदिस्त करण्याची कारवाई सुरू केली.

शनिवारी कबूतर प्रेमी, जैन समाजाच्या विरोधाला न जुमानता दादर येथील कबुतरखाना बंदिस्त करण्यात आला. आता त्यापाठोपाठ फोर्ट परिसरातील जीपीओ समोरील कबुतरखानाही बंदिस्त करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी कबुतरांना खायला दाणे टाकण्यास मनाई करण्यात आल्याने या कबुतरखान्याच्या ठिकाणी कबुतरांची संख्या ९९.९९ टक्के कमी झाल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, सोमवारी सायंकाळी महापालिका ए वॉर्ड कार्यालयातून हालचालींना जोरदार सुरुवात झाल्याचे सूत्रांकडून समजते. त्यासाठी पालिकेचे काही कर्मचारीही जीपीओ समोरील कबुतरखान्याच्या ठिकाणी सोमवारी सायंकाळी दाखल झाले होते.

### कबुतर खाना बंद करणार

जीपीओ समोरील कबुतरखान्याच्या ठिकाणी कबुतरांना खायला दाणे घालण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे खूपच फरक पडला असून कबुतरांची संख्या खूपच कमी झाली असून हा कबूतरखाना बंदिस्त करण्याचा विचार सुरू आहे, अशी माहिती ' ए ' वॉर्डचे सहाय्यक आयुक्त जयदीप मोरे यांनी सांगितले.

## चित्रपटाच्या स्क्रीनिंगदरम्यान अपघात, थिएटरचं छत कोसळलं, तीनजण जखमी

**गुवाहाटी** - 'महावतार नरसिंह' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर उत्तम कामगिरी करत आहे. अशातच अश्विन कुमार दिग्दर्शित 'महावतार नरसिंह' या ॲनिमेशन चित्रपटादरम्यान, गुवाहाटी येथील एका थिएटरचं छत कोसळलं. या अपघातात तीन जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. या अपघाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. थिएटरच्या खुर्च्यांजवळ छताचे तुटलेले तुकडे दिसत आहेत. प्रेक्षकांचा थिएटर मालकाशीही जोरदार वाद झाला. सध्या जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून छत कोसळल्याबद्दल थिएटर व्यवस्थापनाकडून कोणतेही अधिकृत विधान देण्यात आलेलं नाही. 'महावतार नरसिंह' हा सिनेमा'सन ऑफ सरदार २' आणि 'धडक २' सारख्या अलिकडचे रिलीज झालेल्या चित्रपटांना मागे टाकत आहे. सॅकनिल्क रिपोर्टनूसार, या चित्रपटानं जगभरात १०५ कोटी रुपये कमावले आहेत. जाणून घेऊया या चित्रपटानं आतापर्यंत किती कमाई केली.



# 24 तासांत हिंदुस्थानवर मोठा टॅरिफ लादणार

## 'मोदींचे मित्र' ट्रम्प यांची पुन्हा धमकी

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हिंदुस्थान रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल खरेदी करत असल्याचा आरोप करत हिंदुस्थानवर मोठा टॅरिफ (आयात कर) लादण्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांनी एका मुलाखतीत सांगितले की, पुढील 24 तासांत हिंदुस्थानवर टॅरिफ वाढवण्याचा निर्णय घेतला जाईल, कारण हिंदुस्थान रशियाकडून तेल खरेदी करत आहे आणि त्याचा मोठा हिस्सा आंतरराष्ट्रीय बाजारात जास्त किमतीत विकून नफा कमवत आहे.

ट्रम्प यांनी हिंदुस्थानवर युक्रेनमधील मानवीय संकटाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही केला आहे. ते म्हणाले, हिंदुस्थानला युक्रेनमध्ये रशियन युद्धामुळे होणाऱ्या मृत्यूंची पर्वा नाही. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत



म्हटले की, हिंदुस्थान रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत आहे आणि त्याचा बहुतांश हिस्सा जास्त नफ्यासाठी बाजारात विकत आहे. यामुळे मी हिंदुस्थानकडून अमेरिकेत येणाऱ्या मालावर टॅरिफ मोठ्या प्रमाणात वाढवणार आहे.

दरम्यान, याआधी यापूर्वी ट्रम्प यांनी हिंदुस्थानी वस्तूंवर 25 टक्के टॅरिफ आणि रशियन तेल खरेदीमुळे अतिरिक्त दंड लावण्याची घोषणा केली होती. याशिवाय अमेरिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी मांडलेल्या एका विधेयकाला ट्रम्प यांनी पाठिंबा दर्शवला आहे, ज्यामुळे रशियाशी व्यापार करणाऱ्या देशांवरील (उदा. हिंदुस्थान आणि चीन) अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर 500 टक्के टॅरिफ लावला जाऊ शकतो. हे विधेयक ऑगस्ट 2025 मध्ये सिनेटमध्ये सादर होण्याची शक्यता आहे आणि त्याला 84 सिनेटर्सचा पाठिंबा आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 1 ऑगस्टपासून विविध देशांवर टॅरिफ लागू करणार असल्याचं जाहीर केलं होतं. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर 25 टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती. त्यासोबत भारतावर रशियासोबत व्यापार करत क्रूड ऑईल आणि शस्त्रखरेदी करत असल्यानं दंड लादणार असल्याचं जाहीर केलं होतं.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेला भारताकडून देखील जशास तसं उत्तर दिलं जात असल्याचं पाहायला मिळत आहे. येत्या काळात अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार करार होत असताना त्यामध्ये कोणत्या गोष्टींवर समझोता होणार ते पाहावं लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत सर्वाधिक टॅरिफ आकारणाऱ्या देशांपैकी एक देश असल्याचं म्हटलं होतं.

# सभागृह तुम्ही चालवत आहात की अमित शहा?

## मल्लिकार्जुन खरगे खवळले



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवारी संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी उपसभापती हरिवंश यांच्यावर सदनाच्या कारभारावरून प्रश्न उपस्थित केला आणि थेट गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधला. खरगे यांनी उपसभापतींना विचारले, सदन कोण चालवत आहे, तुम्ही की अमित शहा?हा प्रश्न त्यांनी केंद्रीय राखीव सुरक्षा दलाच्या (CRPF) कथित उपस्थितीवरून आणि विरोधकांच्या आवाज दाबण्याच्या आरोपावरून केला.

मल्लिकार्जुन खरगे यांनी आरोप केला की, सरकार विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सीआयएसएफसारख्या अर्धसैनिक दलांचा वापर करत आहे, जे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन आहे. ते म्हणाले, जर सीआयएसएफ किंवा कोणतेही अर्धसैनिक दल आमचा आवाज दाबण्यासाठी सदनात आणले गेले असेल, तर हे अत्यंत निंदनीय आहे आणि लोकशाहीच्या मूल्यांचा अपमान आहे. ते माजी विरोधी पक्षनेते अरुण जेटली आणि सुषमा स्वराज यांचा उल्लेख करत म्हणाले की, त्यांनीही अशा प्रकारच्या व्यत्ययांना लोकशाहीचा भाग मानले होते.

पान 1 वरुन..

## दोन वर्षांपूर्वी भाजप प्रवक्त्या...

सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचं केंद्रीकरण होऊ नये तसेच check and balance राहावा यासाठी संविधानात seperation of power चं तत्व अवलंबलं आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे seperation of power च्या तत्वाला आणि पर्यायाने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? जेंव्हा उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावरील व्यक्ती राजकीय पार्श्वभूमी आणि सत्ताधारी पक्षातील पदाचा उपभोग घेतलेली असेल तेंव्हा न्यायदानाची प्रक्रिया राजकीय आकस बाळगून होणार नाही, याची खात्री कोण देणार? एका राजकीय व्यक्तीच्या नियुक्तीने पुर्ण न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का?

व्यक्तीच्या पात्रतेबाबत आक्षेप नाही, परंतु...

सदरील नियुक्त व्यक्तीच्या पात्रतेबाबत कुठलाही आक्षेप नाही, परंतु संबंधित व्यक्तीची नियुक्ती करताना 'न्यायदान हे सामान्य नागरिकांसाठी कोणत्याही अभिनिवेशाशिवाय असते' या सामान्य माणसांच्या भावनेलाच आघात बसत आहे. परिणामी संबंधित राजकीय व्यक्तीची न्यायाधीश पदावरील नियुक्तीबाबत पुनर्विचार करावा. आदरणीय सरन्यायाधीश साहेबांनीही याबाबत मार्गदर्शन करायला हवं. अस रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत प्रश्न केला आहे.

## एसटी महामंडळ 'यात्री ॲप'

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमावून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खासगी कंपन्यांच्या जोखडातून मुक्त करण्याच्या प्रामाणिक हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा, टॅक्सी व ई-बस या वाहन सेवेकरीता सुरू करण्याचे निश्चित केले आहे. हे ॲप परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येईल. भविष्यात एसटी महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे व प्रवाशांना एक विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे हा उद्देश समोर ठेवून हे ॲप एसटी महामंडळाने नियंत्रित करावे, असेही परिवहन मंत्री श्री.सरनाईक यांनी यावेळी सांगितले. 'छावा राईड ॲप' नाव देण्याचे सर्वानुमते निश्चित झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने हे ॲप लवकरच कार्यान्वित करण्यात येईल, असेही सरनाईक म्हणाले. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, केंद्र सरकारच्या ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्वानुसार या ॲपची नियमावली अंतिम टप्प्यात आहे. सध्या खासगी संस्था अनधिकृत ॲपच्या माध्यमातून प्रचंड नफा कमवतात. त्यासाठी त्या कंपन्या चालक व प्रवासी यांची लूट करीत आहेत. एसटी महामंडळाकडे यंत्रणा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ व जागा मुबलक प्रमाणात असल्यामुळे असे ॲप विकसित केल्यास त्याचा फायदा प्रवाशांबरोबर एसटी महामंडळाला देखील होईल.

## कॅनडात खलिस्तान्यांच्या कुरापती सुरुच

# 'रिपब्लिक ऑफ खलिस्तान' नावाने उभारले बनावट दूतावास

वृत्तसंस्था
ओटावा

खलिस्तानी समर्थकांनी कॅनडामध्ये पुन्हा एकदा डोकं वर काढायला सुरुवात केली आहे. जस्टिन ट्रुडो यांचे सरकार गेल्यानंतर मार्क कार्नी यांचे सरकार आले. या सरकारच्या काळात खलिस्तान्यांवर आळा बसेल, अशी शक्तता वर्तवली जात होती. मात्र, आता खलिस्तानी समर्थकांनी हद्द पार केली आहे. कॅनडातील सरे येथे खलिस्तानवाद्यांनी 'रिपब्लिक ऑफ खलिस्तान' नावाने दूतावास स्थापन केला आहे.

बनावट दूतावासाची बातमी येताच आता भारतातील तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. भारतीय यंत्रणा सरेमधील खलिस्तानी दहशतवादी कारवायांवर लक्ष ठेवून आहेत. तिथून आलेल्या अहवालात म्हटले आहे की, भारताने दहशतवादी घोषित केलेल्या खलिस्तानवादी हरदीप सिंग निज्जरच्या समर्थनार्थ हे दूतावास स्थापन करण्यात आले आहे. या बनावट दूतावासावर




हरदीप सिंग निज्जरशी संबंधित पोस्टर चिकटवण्यात आले आहेत. इतकेच नाही तर कॅनडातील खलिस्तानी संघटना एसएफजे (शीख्स फॉर जस्टिस) ने येत्या काही दिवसांत आणखी एक कथित शीख जनमत संग्रह घेण्याची घोषणा केली आहे.

सुरक्षा यंत्रणांना भीती आहे की, केवळ भारतविरोधी वातावरणच नाही, तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देण्यासाठी परदेशातील भूमीचा वापर केला जात आहे. कॅनडा हा खलिस्तान चळवळीचा बालेकिल्ला मानला जातो. १९७० च्या दशकात कॅनडामध्ये खलिस्तान चळवळीबाबत पहिल्यांदाच टपाल तिकिटे जारी करण्यात आली. येथेच खलिस्तान्यांनी पहिल्यांदाच त्यांचे चलन जारी केले. सध्या खलिस्तान चळवळीचे अनेक नेते कॅनडामध्ये राहतात.

कॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनीही खलिस्तान्यांना उघडपणे पाठिंबा दिला होता. ट्रुडोच्या धोरणामुळे कॅनडा आणि भारताने राजनैतिक संबंध संपवले होते. मात्र, ट्रुडोची सत्ता गेल्यानंतर परिस्थिती बदलली. कॅनडाचे नवे पंतप्रधान कार्नी दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध सुधारण्यावर भर देत आहेत. अलीकडेच, कॅनडा आणि भारताने खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्यासाठी कराराचा प्रस्ताव तयार केला होता. या प्रस्तावानुसार, दोन्ही देशांच्या एजन्सी एकमेकांशी गुप्त माहिती सामायिक करू शकतील. या निर्णयामुळे सीमापार गुन्हेगारी, दहशतवाद, कट्टरतावाद आणि संघटित गुन्हेगारी यासारख्या मुद्द्यांवर संयुक्तपणे काम केले जाईल.

## राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी ....

(पान १ वरुन..) प्राधिकरणाद्वारे करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री तर पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष असणार आहेत. यासोबतच पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती कार्यरत राहील. या राज्यस्तरीय समितीमध्ये तांत्रिक तज्ज्ञ, वित्तीय व कायदेशीर सल्लागार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (MPCB) सदस्य सचिव तसेच आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांतील तज्ज्ञ सदस्य यांचा समावेश असेल. राज्यातील नद्यांचे शाश्वत पुनरुज्जीवन साध्य करण्यासाठी हे प्राधिकरण व्यापक काम करणार आहे. दैनंदिन कामकाजासाठी एमपीसीबीचे सदस्य सचिव प्रमुख असलेले एक समर्पित सचिवालयही स्थापन करण्यात येणार आहे.

## UP मध्ये मृत महिलेच्या खात्यात 10 लाख कोटी

**नोएडा :** उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये कोटक महिंद्रा बँकेच्या खात्यात १० लाख कोटींहून अधिक रुपये जमा झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. नोएडामधील एका मृत महिलेच्या खात्यात १० लाख १ हजार ३५६ लाख कोटींहून अधिक (१००१३५६००००००.०००१००२३५६) रुपये जमा झाल्याचा मेसेज आला. महिलेच्या मुलाने त्याच्या मोबाईलवर मेसेज पाहिल्यावर तो बँकेत पोहोचला.

# उद्धव ठाकरे दिल्लीत पोहोचण्याआधीच खा.प्रियंका चतुर्वेदी मोदींच्या भेटीला

## राजकीय वर्तुळात खळबळ

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. मात्र, ही भेट पूर्णपणे 'सहज' होती आणि तिचा कोणताही राजकीय अर्थ काढू नये, असे स्पष्टीकरण चतुर्वेदी यांनी दिले आहे.



'इंडिया' आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीपूर्वी आणि उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे अनेक तर्कवितर्क लढवले जात होते, ज्यावर आता स्वतः चतुर्वेदी यांनी पडदा टाकला आहे. सोमवारी (दि.४) पंतप्रधान मोदींना भेटण्यापूर्वी आपण खासदार संजय राऊत यांची भेट घेतल्याचेही त्यांनी सांगितले. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी विविध राजकीय विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

पंतप्रधान मोदींसोबत झालेली भेट ही राजकीय नव्हती, असे उबाठा पक्षाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी ठामपणे सांगितले आहे. "पंतप्रधान यांच्यासोबत माझी चांगली चर्चा झाली. मात्र, यामध्ये महाराष्ट्राच्या अनुषंगाने किंवा इतर कोणताही राजकीय संवाद झाला नाही. त्यामुळे या भेटीचा राजकीय अर्थ लावण्यात काहीही तथ्य नाही," असेही त्या म्हणाल्या. उद्धव ठाकरे 'इंडिया' आघाडीच्या बैठकीसाठी दिल्लीत येत असतानाच ही भेट झाल्याने तिला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

# जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्यासाठी 8 ऑगस्टला सुनावणी

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याच्या बातम्यांदरम्यान, या प्रकरणाची सुनावणी ८ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. जम्मू आणि काश्मीरचे प्राध्यापक झहूर अहमद भट्ट आणि सामाजिक कार्यकर्ते खुर्शीद अहमद मलिक यांनी ही याचिका दाखल केली आहे. यामध्ये केंद्र सरकारला निर्धारित वेळेत जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याचे निर्देश देण्याचे म्हटले आहे.

याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला आहे की जम्मू आणि काश्मीरमध्ये पंचायत निवडणुका आणि नगरपालिका निवडणुका झाल्या आहेत. सध्याची सुरक्षा आणि प्रशासकीय परिस्थिती राज्याचा दर्जा पुनर्संचयित करण्यासाठी अनुकूल आहे. दीर्घकाळ राज्याचा दर्जा पुनर्संचयित न करणे हे नागरी हक्कांचे उल्लंघन आहे.

प्रत्यक्षात, ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द केल्यानंतर, केंद्र सरकारने त्याला केंद्रशासित प्रदेश बनवले होते. त्यानंतर, केंद्राच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. डिसेंबर २०२३ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने राज्यातून कलम ३७० काढून टाकणे आणि विशेष राज्याचा दर्जा संपवणे योग्य मानले होते.

तत्कालीन सर्वोच्च न्यायालयाचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकार जम्मू आणि काश्मीरचा राज्य दर्जा पुनर्संचयित करेल असे आश्वासन दिले होते. तथापि, न्यायालयाने या पुनर्संचयनासाठी कोणतीही स्पष्ट कालमर्यादा दिली नाही.

## भाजप नेत्यावर जीवघेणा हल्ला, कारवर दगडफेक

कोलकाता

भारतीय जनता पक्षाचे शुभेंदू अधिकारी यांच्या ताफ्यावर अज्ञातांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. सुरक्षा असताना भाजपचे वरिष्ठ नेत्यावर हल्ला झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भाजप नेते शुभेंदू यांच्या ताफ्यावर अज्ञात हल्लेखोरांनी दगडफेक केली. या हल्ल्यात कारच्या काचा फुटल्या. शुभेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वात भाजपकडून रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजप नेते शुभेंदू अधिकारी हे काही आमदारांसोबत मंगळवारी दुपारी ताफ्यासोबत पोलीस अधीक्षकांच्या भेटीला निघाले होते. त्याचवेळी खगराबाडीजवळ काही लोकांनी त्यांना काळे झेंडे दाखवून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी भाजप नेत्याच्या ताफ्यावर चपला, दगडफेक केली.

## अखेर ममता बॅनर्जींची कारवाई

# 'वाचाळ' कल्याण बॅनर्जी यांची उचलबांगडी

वृत्तसंस्था
कोलकाता

तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनजी आणि महुआ मोइत्रा यांच्यातील वाद काही दिवसांपूर्वीच चव्हाट्यावर आला होता. त्यावरून पक्षातही वादळ उठले होते. पक्षाच्या सुप्रिमो व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दोन्ही नेत्यांना तंबी दिल्याची चर्चा होती. पण त्यानंतर आता पक्षांतर्गत मोठी घडामोड घडली आहे.

तृणमूल काँग्रेसमध्ये सोमवारी मोठ्या घडामोडी घडल्या. कल्याण बॅनर्जी यांनी ममतादीदींची भेट घेतल्यानंतर तडकाफडकी लोकसभेतील चीफ व्हीप पदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा




ममता बॅनर्जी यांनी स्वीकारला आहे. पक्षातील दोन नेत्यांमधील वादाचा हा परिणाम असल्याची चर्चा राजकीय वर्तूळात आहे.

संसदेतील खासदारांमध्ये समन्वय नसल्याचा दोष आपल्यावर टाकण्यात आल्याचा आरोप कल्याण बॅनर्जी यांनी केला होता. त्यानंतर आता तृणमूलकडून दोन महिला खासदारांवर महत्वाची जबाबदारी सोपवली आहे. लोकसभेत काकोली घोष दस्तीगीर यांना पक्षाचे चीफ व्हिप तर शताब्दी राय यांना उपनेता बनविले आहे. पक्षाने पहिल्यांदाच एकाचवेळी दोतृणमूलने एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, कल्याण बनर्जी यांनी ४ मेला संसदीय दलाच्या चीफ व्हिपचा राजीनामा पक्षाच्या अध्यक्षांकडे दिला आहे. राजीनामा स्वीकारण्यात आला आहे. पक्षातील वरिष्ठ खासदारांच्या सल्ल्याने काकोली घोष यांनी चीफ व्हिप तर रॉय यांना उपनेता बनविण्यात आले आहे.

# भारताला धमकी मिळाल्यानंतर रशिया संतापला अमेरिकेला सांगितलं 'धमकी देऊ नका'

वृत्तसंस्था
मॉस्को

भारत आणि रशियाच्या तेल खरेदीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठ्या प्रमाणात कर लादण्याचा इशारा दिला आहे. या इशाऱ्यानंतर भारत आणि रशिया या दोन्ही देशांनी अमेरिकेला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.



मंगळवारी अमेरिकेच्या धमकीवर रशियाने जोरदार प्रतिक्रिया दिली. "इतर देशांना रशियासोबत व्यवसाय करण्यापासून रोखणे बेकायदेशीर आहे", असं क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह म्हणाले. "प्रत्येक देशाला आपल्या व्यापाराचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. कोणावरही असा दबाव आणणे ही 'धमकी' मानली जाईल. रशियाचे हे विधान ट्रम्प यांनी दिलेल्या इशाऱ्याच्या दुसऱ्याच दिवशी आले आहे. अमेरिकेने याआधी भारताला रशियाकडून तेल घेतले तर कर वाढवले जातील असा इशारा दिला होता. यानंतर भारतानेही अमेरिकेला प्रत्युत्तर दिले होते.

सोमवारी रात्री डोनाल्ड ट्रम्प यांनी करबाबत भारताला इशारा दिला होता. ट्रम्प म्हणाले होते की, भारत केवळ रशियन तेल खरेदी करत नाही तर ते खुल्या बाजारात विकून नफाही कमावत आहे. "युक्रेनमध्ये रशियन सैन्य किती लोकांना मारत आहे याची भारताला पर्वा नाही. म्हणूनच मी भारतावर मोठे शुल्क लादणार आहे".

डोनाल्ड ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर भारत सरकारने प्रत्युत्तर दिले. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, "भारताला अशा प्रकारे लक्ष्य करणे चुकीचे आहे. आपण एक मोठी अर्थव्यवस्था आहोत आणि आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलू." भारताने स्पष्ट केले की, आम्ही स्वतःचं निर्णय घेऊ आणि कोणाच्याही दबावाखाली येणार नाही.

## सुनेच्या दारु पार्टीची सासऱ्यानंच दिली टिप

### सहाजण अटकेत

**सुरत ।** गुजरातमध्ये एक विचित्र प्रकरण समोर आले आहे. येथे सुनेच्या दारूच्या पार्टीची टिप सासऱ्याने पोलिसांना दिल्याचा प्रकार समोर आला आहे. संबंधित पार्टीची माहिती मिळाल्यानंतर सुरतच्या डुमस पोलिसांनी 'विकेंड एड्रेस' नावाच्या एका हॉटेलात चाललेल्या एका पार्टीवर छापेमारी केल्याची घटना समोर आली आहे. या पार्टीमध्ये कथितपणे मद्य दिले जात होते असा आरोप असून याप्रकरणी चार पुरुष आणि दोन महिलांना अटक करम्यात आली आहे. अटक करण्यात आलेले सर्वजन हे २३ ते २५ वर्षे वयोगटातील आहेत. विशेष बाब म्हणजे सुरत पोलिसांच्या कंट्रोल रुमला एका व्यक्तीने फोन करून त्याची सून खोली क्रमांक ४४३ मध्ये सुरू असलेल्या एका दारू पार्टीत गेल्याची माहिती दिली होती. त्यानंतर डुमस पोलिसांनी या खोलीवर छापा टाकला आणि आरोपींनी दारूच्या बाटल्यांसह रंगेहाथ पकडले. अटक केलेल्या दोन्ही महिला या कलाकार आहेत तर पुरुष हे प्रोफेशनल आणि व्यावसायिक आहेत.

# भारतीय लष्कराने ट्रम्प यांच्याविरोधात ठोकला शड्डू पाकिस्तानला मदत केल्याचे पुरावे केले सादर

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची धमकी देत आहे. ट्रम्प व व्हाइट हाउसमधील त्यांचे अधिकारी आंतरराष्ट्रीय पातळीवरून भारताला इशारे देत आहेत, भारताकडून दंड वसूल करण्याची भाषा वापरली जात आहे. दुसऱ्या बाजूला, भारताचा परराष्ट्र विभाग अमेरिकेशी दोन हात करत आहे. अशातच परराष्ट्र विभागाच्या मदतीसाठी भारतीय लष्कर सरसावलं आहे. भारतीय लष्कराने अमेरिकेच्या शांततावादाचा बुरखा फाडला आहे. ट्रम्प प्रशासन युक्रेन युद्धात भारत रशियाची मदत



करत असल्याचा कांगावा करत असतानाच भारतीय लष्कराने अमेरिकेच्या भारताविरोधातील कुरापतींचे पुरावे सादर केले आहेत.

१९७१ च्या युद्धावेळी अमेरिका पाकिस्तानला हाताशी धरून भारताविरोधात कटकारस्थान रचत होती. त्याचे पुरावे भारतीय लष्कराने समाजमाध्यमांवर शेअर केले आहेत. भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडने एक्सवर वर्तमान पत्रातील एक बातमी शेअर केली आहे. ही बातमी ५४ वर्षे जुनी आहे. या बातमीत म्हटलं आहे की १९५४ ते १९७१ या १७ वर्षांमध्ये अमेरिकेने पाकिस्तानला २ बिलियन डॉलर्सहून (१ लाख कोटी रुपये) अधिक किमतीची शस्त्रास्रे पुरवली होती.

भारतीय लष्कराने जुन्या वर्तमानपत्राचं एक कात्रण शेअर केलं आहे. हे ५ ऑगस्ट १९७१ च्या अंकामधील कात्रण आहे. अमेरिका अनेक दशकांपासून पाकिस्तानला शस्त्रास्रे पुरवत होती. या शस्त्रास्रांच्या बळावरच पाकिस्तान सातत्याने भारताला युद्धाचं आव्हान देत होता. अमेरिकेने दिलेली शस्त्रास्रं पाकिस्तानने वेळोवेळी भारताविरोधात वापरली होती. उभय देशांमध्ये झालेल्या प्रत्येक संघर्षात पाकिस्तानने अमेरिकेची 'भेट' भारताविरोधात वापरली होती. अमेरिकेने १९६५ व १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धांची बीजं आधीच पेरली होती.